cmyk

## संपादकीय

### सावधानता हाच सर्वोत्तम उपाय !

देशाची राजधानी असलेल्या नवी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्याच्या परिसरात झालेल्या कार बॉम्बस्फोटामुळदहशतवादाने पुन्हा एकदा डोके वर काढल्याचे दिसते. राजधानी दिल्लीतील लाल किल्ला व मेट्रो परिसर हा गजबजलेला भाग म्हणून ओळखला जातो. या भागात कायम प्रवासी आणि पर्यटकांची गर्दी असते.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२०९ | बुधवार दि.२६ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# तीन आठवडे उलटले ऊस दराची कोंडी कधी फुटणार

बारामती । प्रतिनिधी

**साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू होऊन तीन आठवड्यांचा कालावधी लोटला आहे. परंतु अद्याप निरा खोऱ्यातील कारखान्यांनी ऊस दराची कोंडी फोडलेली नाही. ऊस उत्पादकांचे डोळे कारखान्यांच्या निर्णयाकडे लागले आहेत. सोमेश्वरने ३५०० रुपयांची उचल जाहीर करत ही कोंडी फोडावी, अशी मागणी बहुतांश शेतकऱ्यांकडून होत आहे.**

सातारा जिल्ह्यातील श्रीराम फलटण, श्री दत्त साखरवाडी यांनी ३३०० रुपये दर जाहीर केल्यामुळे ऊस उत्पादकांमध्ये चर्चेला चांगलेच उधाण आले आहे. या जाहीर केलेल्या दरामुळे श्री सोमेश्वर, माळेगाव, छत्रपती आदी कारखान्यांना याचा फटका बसू शकतो. या कारखान्यांचा दर जाहीर नसल्याने व ऊस तोडीस विलंब करण्यापेक्षा एक रकमी ३३०० रुपये मिळतात तसेच हे कारखाने दिवाळीला साखर देत असल्याने अनेकांचा कल या कारखान्यांकडे आहे. याशिवाय या कारखान्यांकडून त्वरित ऊस तोड मिळत असल्याने पुढील हंगाम साधण्यासाठी अनेक जण या कारखान्यांना ऊस देण्याच्या मानसिकतेत आहेत. ऊस परजिल्ह्यात गेल्यास निरा खोऱ्यातील साखर कारखान्यांना ऊस कमी पडू शकतो, अशी स्थिती आहे.



## थोडक्यात...

### माजी आमदार निर्मला गावित यांना कारने उडवले

नाशिकः माजी आमदार निर्मला गावित यांचा भीषण अपघात झाला असून, घराजवळ नातवासोबत फेरफटका मारत असताना हा अपघात झाल्याची माहिती आहे. पाठीमागून येणाऱ्या चारचाकी कारने निर्मला गावित यांना उडविले. या अपघातात निर्मला गावित गंभीर जखमी झाल्या आहेत. इगतपुरी विधानसभा मतदारसंघातून त्यांनी २०१४ साली आमदारकी मिळवली होती. ठाकरे गटाला जय महाराष्ट्र करत त्यांनी एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला होता. नाशिकच्या एका खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात निर्मला गावित यांच्यावर उपचार सुरू आहेत. सोमवारी झालेल्या अपघातातील या घटनेचा थरारक व्हीडीओ समोर आल्यानंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. कारण, कारने अगदी पाठीमागून त्यांना उडवल्याचे व्हीडीओमध्ये पाहायला मिळत आहे.

### शक्ती कपूर सुपूत्र सिद्धांतला मुंबई पोलिसांचे समन्स

मुंबईः गेल्या काही दिवसांपासून एक ड्रग सिंडिकेट प्रकरण बॉलिवूडमध्ये चर्चेत आहे. या प्रकरणात अनेक बॉलिवूड कलाकारांना चौकशीसाठी समन्स धाडण्यात आले आहे. अशातच आता या प्रकरणी शक्ती कपूर यांचा मुलगा आणि बॉलिवूड अभिनेत्री श्रद्धा कपूरचा भाऊ सिद्धांत कपूरच्या अडचणी वाढल्याचे दिसत आहे. सिद्धांत कपूरलाही या प्रकरणी चौकशीसाठी समन्स धाडण्यात आले आहेत. सिद्धांत कपूर चौकशीसाठी घाटकोपरच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षात दाखल झाला. अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या घाटकोपर यूनिटने सिद्धांत कपूरला हजर होण्यास समन्स बजावले होते. तर याच प्रकरणी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर ऑरीला देखील मुंबई पोलिसांनी हजर राहण्याचे समन्स बजावले आहे.

### साखरेचा दर प्रति किलो ३८ रुपये करणार?

दिल्लीः केंद्र सरकार साखरेच्या किमान विक्री दरात वाढ करेल, या शक्यतेची जोरदार चर्चा सुरु आहे. सरकारने मागील सात वर्षांपासून साखरेच्या किमान विक्री दरात वाढ केली नाही. परंतु साखर उद्योगाकडून विक्री दरात वाढ करण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार साखरेच्या दरात २३ टक्के वाढ करून विक्री दर प्रति किलो ३८ रुपये करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच इथेनॉलच्या खरेदीत दरात वाढ करण्यात येईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. केंद्र सरकारने २०१९ पासून साखरेचा किमान विक्री दर प्रति किलो ३१ रुपये कायम ठेवला आहे. परंतु उत्पादन खर्च वाढत असल्याने साखरेच्या विक्री दरात वाढ करण्याची आग्रही मागणी उद्योगाकडून केली जात आहे.

### कर्नाटकात आता खासगी क्षेत्रातही आरक्षण लागू

बंगळुरूः कर्नाटक सरकारने एक ऐतिहासिक निर्णय घेत प्रायव्हेट सेक्टरमध्येही दिव्यांगांसाठी आरक्षण लागू केले आहे. आता राज्यातील कोणत्याही खासगी कंपनीत जर २० किंवा त्याहून अधिक कर्मचारी काम करत असतील, तर त्या कंपनीत दिव्यांग व्यक्तींना ५% आरक्षण असेल. सरकारने हे लागू करताच हा नियम संपूर्ण राज्यात तात्काळ लागू झाला आहे. फक्त नोकऱ्यांमध्येच नव्हे तर शिक्षण क्षेत्रातही बदल केला आहे. राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना प्रत्येक कोर्समध्ये १०% सीट्स दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवाव्या लागतील. प्रवेश प्रक्रियेपासून ते परीक्षा सुविधांपर्यंत दिव्यांगांसाठी विशेष सोयी उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही संस्थांवर असेल.

# निवडणूक आरक्षणासंबंधी सुनावणी पुन्हा लांबली

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण प्रकरणी मंगळवारी (२५ नोव्हेंबर) सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी पार पडली. यावेळी वरिष्ठ वकील जयसिंग यांनी निवडणूक प्रक्रिया अधिसूचित झाली आहे. आता ती थांबवता येणार नाही. आरक्षणातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्था या आदिवासी क्षेत्रात आहेत, असा युक्तिवाद केला. आता ही सुनावणी पुढील शुक्रवारी होणार आहे.

यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, आम्ही लोकशाही सुरळीतपणे चालेल याची खात्री करणार आहोत. याबाबत आम्ही कोणतेही मत व्यक्त करत नाही. यावेळी सॉलिसिटर जनरल यांनी याप्रकरणी आणखी वेळ हवा, अशी मागणी केली. ही मागणी मान्य करत खंडपीठाने या प्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी (२८ नोव्हेंबर) ठेवली आहे. या प्रकरणी आम्ही कोणतेही मत व्यक्त करत नाही; पण आम्ही लोकशाही सुरळीतपणे चालेल याची खात्री करणार आहोत.

५० ते ६० टक्के लोकांच्या लढाईत लोकांना प्रतिनिधित्व मिळत नाही. आम्ही निवडणुका घेण्याचे निर्देश देऊ

▶▶ पान २ वर

### शुक्रवारी होणार सुनावणी

५० टक्के मर्यादेचे उल्लंघन झालेल्या भागात ओबीसी टक्केवारीबद्दल पुढील तारखेला व्यापक माहिती देण्याचा सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी आदेश दिला. आता या प्रकरणी पुढील सुनावणी शुक्रवार, २८ नोव्हेंबर रोजी होणार आहे.



# मतदारयादी दुरुस्तीचे अधिकार आयुक्तांना

### राज्य निवडणूक आयोगाचा खुलासा

मुंबई । प्रतिनिधी

आगामी महापालिका निवडणुकीच्या प्रारूप मतदार यादीतील चुका दुरुस्त करण्याचे अधिकार आयुक्तांना असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे सचिव काकाणी यांनी पत्र जारी केले आहे.

यामुळे नागरिकांच्या हरकती, प्रशासनाच्या निदर्शनास आलेल्या चुकांचे निराकरण पालिका आयुक्तांनी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महापालिकेने जाहीर केलेल्या



प्रारूप मतदारयादीत मोठ्या प्रमाणावर

▶▶ पान २ वर

# अजित पवारांच्या ताफ्यातील गाडीच्या धडकेतील जखमी महिलेचा मृत्यू

किल्ले धारूर । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील अग्निशामक दलाच्या गाडीने दिलेल्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या कुसुम विष्णु सुदे (वय ३०) यांनी अखेर उपचारादरम्यान प्राण गमावले असून, सुदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याच्या पार्थीवावर दिंद्रूड येथे मंगळवारी दुपारी अंत्यसस्कार करण्यात आले. या अपघात प्रकरणी धारूर पोलीस स्टेशन मध्ये संबंधीत वाहन व वाहन चालकावर गुन्हा नोंदविण्यात आल्याची माहिती आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार (दि.२२) रोजी परतूरहून औसा येथे प्रचारसभेसाठी जात असताना, तेलगाव – धारूर महामार्गावरील धूनकवड फाटा येथे ही दुर्घटना घडली होती. ताफ्यातील वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत कुसुम सुदे, त्यांची पती विष्णु दामोदर सुदे (३५) आणि दोन लहान मुली रागिणी (९) व अक्षरा (६) गंभीर जखमी झाले होते. झालेला अपघात इतका भीषण होता की, दुचाकी संपूर्ण उद्ध्वस्त झाली आणि चारही

▶▶ पान २ वर

# ५०० वर्षांचा संकल्प पूर्ण झाला...!

### मोदींच्या हस्ते राम मंदिरावर धर्मध्वजारोहण संपन्न

अयोध्या । वृत्तसंस्था

अयोध्येतील राम मंदिरावर मंगळवारी (दि. २५ नोव्हेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते धर्म ध्वाजाचे रोहण करण्यात आले. यावेळी उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीनेब पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राष्ट्रीय स्वयंम सेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत उपस्थित होते. यावेळी ५०० वर्षांचा संकल्प पूर्ण झाला असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.



या ध्वजारोहणाच्या कार्याक्रमावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जवळपास ५०० वर्षापूर्वीपासूनचा संकल्प पूर्ण झाला. आज संपूर्ण जग हे राममय झालं असल्याचे उद्गार काढले. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याची स्थापना करण्याचा प्रयत्न करत आहोत असे वक्तव्य देखील केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी राम मंदिरावरील ध्वाजारोहणानंतर बोलताना म्हणाले, हा धर्मध्वज हा फक्त ध्वज नाही तर हा भारतीय सभ्यतेचा संस्कृतीचा कायकल्प आहे. भगवा रंग, सूर्यवंशाचं प्रतिक, ओम आणि कोविदार वृक्ष ही राम राज्याची प्रतिके आहे.

▶▶ पान २ वर

# नवीन कामगार कायद्यांमुळे ७७ लाख नोकऱ्या!

### बेरोजगारी १.३ टक्क्यांनी घटणार; एसबीआयचा महत्त्वाचा अहवाल

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्र सरकारने लागू केलेल्या नवीन कामगार सुधारणा भारतीय अर्थव्यवस्थेसाठी गेमचेंजर ठरू शकतात. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालानुसार, या नवीन कामगार संहितांमुळे देशात ७७ लाख नवीन नोकऱ्यांची निर्मिती होईल आणि बेरोजगारीचा दर १.३ टक्क्यांपर्यंत कमी होईल.

एसबीआयच्या अहवालात म्हटले आहे की, नवीन कायद्यांच्या अंमलबजावणीनंतर मध्यम कालावधीत बेरोजगारी १.३ टक्क्यांनी कमी होईल,



ज्यामुळे ७७ लाख अतिरिक्त लोकांना रोजगार मिळेल. हे मूल्यांकन १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींच्या सध्याच्या कामगार दल सहभाग दरावर आधारित आहे. सध्या कामगार दलात ६०.४ टक्के औपचारिक कामगार आहेत. नवीन कायद्यांमुळे औपचारिकीकरणाचा वाटा किमान १५ टक्क्यांनी वाढेल आणि एकूण औपचारिक

▶▶ पान २ वर

# जातीच्या अधारावर समाजाचे विभाजन करु नये–सरन्यायाधीश सूर्यकांत

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

काहीही झाले तरी आपण जातीच्या अधारावर समाजाचे विभाजन करु नये, असे स्पष्ट मत भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी व्यक्त केले. मंगळवारी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रकरणाची सुनावणी झाली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा वाढली असून इतर मागासवर्गीयांना लोकशाहीतील प्रतिनिधित्वापासून वंचित ठेवेल,



अशी चिंता विव्ध राजकिय पक्षांनी व्यक्त केली होती. त्यानंतर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी यावर आपले मत व्यक्त केले. मंगळवारी झालेल्या सुनावणीमध्ये ज्येष्ठ वकिल इंदिरा जयसिंग यांनी, महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये आदिवासी संख्या लक्षणीय असल्याचे सांगताना, त्या भागामध्ये केवळ एससी–एसटी आरक्षण ५० टक्के असेल, यामुळे ओबीसींच्या आरक्षणासाठी जागाच राहणार नाही, असे सांगितले.

सन १९३१ पासून कोणतीही जनगणना झाली नाही,

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५.५० क्विंटल | २,३०० | २,९७१ | २,६५५ |
| ज्वारी/हायब्रिड: २१.०० क्विंटल | २,७०० | ३,७२० | ३,१२९ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : १९.०० क्विंटल | ३,००० | ५,३५१ | ४,५९२ |
| बाजरी: १३.०० क्विंटल | २,६१० | २,९४५ | २,८१४ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,१०१ | ५,१०१ | ५,१०१ |
| सोयाबीन: ६५.०० क्विंटल | ४,४५० | ४,५८० | ४,५११ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

# डॉ.गौरी गर्जेची आत्महत्या नसून खूनच

### पालकाचा जावई अनंत गर्जे आणि त्यांच्या कुटुंबियांवर गंभीर आरोप

मुंबई । प्रतिनिधी

**गौरी गर्जे यांचे वडील अशोक पालवे यांनी इतर कुटुंबियांसोबत पत्रकार परिषद घेतली. यावेळी अशोक पालवे यांनी जावई अनंत गर्जे यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबियांवर गंभीर आरोप केले. ''गौरी गर्जे यांनी गळफास घेतला असता तर त्याचे व्रण गळ्यावर पडले असते. कारण मी सुद्धा पेशंट तसे पाहिले आहेत. पीएम रुममध्ये गेलेलो आहे. तिच्या छातीवर अनेक खुणा आणि डोक्याला मार दिसला. म्हणजेच हाणामारीत तिचा मृत्यू झाला, असा माझा दावा आहे. मी डोळ्यांनी पाहिले आहे'', असं गौरी यांचे वडील अशोक पालवे म्हणाले. यावेळी त्यांनी आणखी गंभीर आरोप केले आहेत.**



अशोक पालवे म्हणाले, तपास अधिकारी यादव मॅडम आहेत. त्या म्हणाल्या की, सर असे काही नाही. पण आम्ही पाहिले तर खुणा दिसल्या. या मार्क कुठून आल्या? याचा कुणी तपास केला आहे का? त्या मार्कवर आमचा संशय आहे. पीएम इन–कॅमेरा केला आहे. मोहिते साहेब त्यावेळी इन्चार्ज होते. त्यांनी त्यावेळेस आम्हाला नेले, पण आतही त्यांनी एखाद्या पालकाला घ्यायला पाहिजे. त्यांची सही घ्यायला पाहिजे. काय केले त्यावर वॉच पाहिजे, अशी विनंती आहे, अशी भूमिका अशोक पालवे यांनी मांडली. माझी मुलगी मारली, असा मला संशय आहे. माझी मुलगी एवढी स्ट्राँग होती. तुम्हाला खात्री करायची

▶▶ पान २ वर

### अंबाजोगाईच्या एका मुलीचा गर्भपात

१ ऑक्टोबरला त्यांनी सामान शिफ्ट केलें. आरोपी पतीने माझ्या मुलीला सांगितले की, हे महत्त्वाचे कागदपत्रे आहेत. नीट ठेव. माझ्या मुलीने ते कागदपत्रे तपासले. त्यामध्ये एक रिपोर्ट हाती लागला. अंबाजोगाईच्या एक मुलीचा २०२१ ला सोनोग्राफी करुन गर्भपात केल्याचा तो रिपोर्ट होता. त्या रिपोर्टवर अनंत गर्जे पती असे नाव आहे असा गंभीर आरोप गौरीच्या वडिलांनी केला आहे.

cmyk

## अग्रलेख

# सकल गुरूजनांना हे शोभत नाही !

तमाम पालकांनी पुन्हा एकदा डोक्यावर हात मारून हताश व्हावे, अशी घटना कोल्हापूरमध्ये उघडकीस आली. राज्यात नुकतीच शिक्षक पात्रता परीक्षा पार पडली. सर्वोच्च न्यायालयाने ही परीक्षा देणे सर्व शिक्षकांसाठी बंधनकारक केले आहे. ही परीक्षा भूतकाळात अनेकदा गैरप्रकारांमुळे गाजली आहे. हेही वर्ष त्याला अपवाद ठरले नाही. परीक्षेच्या पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आले. त्या आरोपावरून अटक केलेल्यांमध्ये काही शिक्षकांचा समावेश असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. अर्थात, हा काही पहिला गैरप्रकार नाही. याआधीही डमी उमेदवार परीक्षेला बसवणे, लाच घेऊन विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करणे असे अनेक आरोप झाले होते.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या तत्कालीन आयुक्तांना अटक देखील झाली होती. पण, ज्या शिक्षकांकडून गुणवान पिढी घडवण्याची अपेक्षा समाज बाळगतो त्यांच्यावरच उपरोक्त आरोप व्हावा, ही शिक्षण क्षेत्राची शोकांतिका आणि पालक-विद्यार्थ्यांची चेष्टा आहे. इत्तर गुन्हेगारांसारखे तोंड काळ्या फडक्याने झाकून खाली मान घातलेल्या शिक्षकांचे माध्यमात प्रसिद्ध झालेले छायाचित्र संवेदनशील माणसांना अस्वस्थ करणारे ठरावे, या परीक्षेचा निकालही फारसा उत्साहवर्धक लागत नसल्याची चर्चाही अधूनमधून झडते. समाज मूल्यांची घसरण आपण अनुभवतो. आदर व्यक्त करण्याचा आदेश देण्याची वेळ शासनावर येते. विद्यार्थी शिक्षकांना मान देत नाहीत, अशीही तक्रार असते. विद्याध्यांमध्ये आक्रमकता आणि हिंसक वृत्ती वाढत आहे. अशा अनेक दुष्परिणामांची पाळेमुळे उपरोक्त प्रकरणांमध्ये सापडू शकतील. पदप्राप्तीसाठी कौशल्यप्राप्ती अनिवार्य आहे. ज्ञान आणि तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. त्यामुळे विविध प्रकारची आव्हाने देखील निर्माण होत आहेत. त्यानुसार प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तींची कौशल्ये विकसित होणे आणि पात्रतेत काळानुसार बदल होणे स्वाभाविक मानले जाते. कदाचित म्हणूनच अनेक क्षेत्रात ज्ञान अद्ययावत करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे राबवली जातात. शिक्षक पात्रता परीक्षा घेण्यामागचा एक उद्देश तो देखील आहे. एकवेळ पेपर अवघड जाणे पालक समजू शकतील. पण त्यासाठी प्रश्नपत्रिका फोडणे म्हणजे गंभीर गुन्हाच, जो परीक्षेच्या मूळ उद्देशालाच सुरुंग लावतो, असे शिक्षक मुलांसमोर काय आदर्श ठेवतील? त्यांच्या सहवासात मुलांमध्ये कोणत्या प्रकारची मुल्ये रुजू शकतील? असे प्रश्न पालकांना पडले असतील. अशा महाभागांचा गुन्हा फक्त एवढाच नसतो. शिक्षकी पेशाच त्यांच्यामुळे बदनाम होतो. पालकांच्या मनात संशय निर्माण होण्याचे पाप त्यांच्याच डोक्यावर मारावे लागेल. वास्तविक, मुलांच्या जडणघडणीच्या वयाच्या टप्यात शिक्षक मोलाची भूमिका बजावतात. साने गुरुजी हे विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. शिक्षक कसा असावा, असे सांगताना ते म्हणत, 'जसे गुळाच्या भेलीभोवती मुंगळे गोळा होतात, तशी ज्याच्याभोवती मुले गोळा होतात तो खरा विद्यार्थीप्रिय शिक्षक, असे शिक्षक आजही मोठ्या संख्येने आढळतात, जे विद्यार्थीप्रिय असतात. अशा शिक्षकांची बदली रद्द करण्यासाठी विद्यार्थी आणि त्यांचे पालक रस्त्यावर देखील उतरल्याच्या घटना अधूनमधून घडतात. करोना काळाने अशा अनेक सर्जनशील, प्रयोगशील आणि शिकण्याप्रती संवेदनशील शिक्षकांचा समाजाला परिचय करून दिला, शाळा बंद असतानाही शिकणे मुलांपर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक शिक्षकांनी अभिनव मार्ग शोधले. शाळा मुलांच्या उंबरठ्यापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. अनेक प्रभावशाली व्यक्तिमत्वे त्यांच्या जडणघडणीचे श्रेय त्यांच्या शिक्षकांनाही भरभरून देतात. अशा शिक्षकांचे विद्यार्थ्यांशी असलेले बंध अधिकाधिक घट्ट होत जाताना आढळतात. विद्यार्थी कितीही प्रभावशाली झाला आणि शिक्षकांची भेट झाली तरी तो आपसूकच शिक्षकांचे चरणस्पर्श करतो ते उगाच नव्हे. अशा शिक्षकांनी शिक्षणाच्या मूलभूत हकांची परिपूर्तता करावी ही सरकारची आणि समाजाचीही अपेक्षा रास्तच नाही का? सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते आणि शिक्षक हा त्यातील सर्वाधिक महत्वाचा घटक मानला जातो. असे शिक्षक घडवण्याचा पात्रता परीक्षा हा एक मार्ग मानला जायला हवा. परीक्षेमागचा तो उद्देश हरवून कसे चालेल? तेव्हा या परीक्षेतील गैरप्रकारांचा सखोल तपास करून दोषींना कठोर शासन करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे. तरच गैरप्रकारांना आळा बसू शकेल.

# बंधुत्व,समता आणि स्वातंत्र्याचा पवित्र ग्रंथ डॉ.बाबासाहेबांच्या शाईतून जन्मलेलं मुक्त भारताच भविष्य-भारतीय संविधान

**२६ नोव्हेंबर हा दिवस भारतासाठी अत्यंत ऐतिहासिक आहे . १९४९ मध्ये आजच्याच दिवशी भारताचे संविधान स्वीकारले गेले आणि म्हणून हा दिवस ' संविधान दिन ' म्हणून साजरा केला जातो . स्वातंत्र्यानंतर राष्ट्र उभे करताना एक बळकट चौकट , समतेचा आधार , न्यायाची हमी आणि स्वातंत्र्याचा श्वास देणारे दस्तऐवज म्हणून संविधानाने भारताला मार्गदर्शन दिले . डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील मसूदा समितीने २ वर्षे ११ महिने १८ दिवस मेहनत करून तयार केलेले हे संविधान आज जगातील सर्वात मोठे , सर्वसमावेशक आणि प्रगत संविधान मानले जाते . संविधान दिन हा फक्त एक औपचारिक दिवस नाही , तर लोकशाहीचे तत्त्व , कर्तव्य आणि नागरिकत्वाची जाणीव जागृत करणारा दिवस आहे . या दिवशी केंद्र शासन आणि राज्य शासनामार्फत संविधान वाचन , प्रस्तावना पठण , लोकशाही जनजागृती , शैक्षणिक स्पर्धा , न्याय - विधी विषयक परिसंवाद , शासकीय कार्यालयांमधील " साक्षर संविधान कार्यक्रम " आणि " कानूनी जागरुकता अभियान " यांसारखे उपक्रम देशभर राबवले जातात . अनेक जिल्हा प्रशासनांकडून शालेय मुलांसाठी संविधान प्रश्नमंजुषा , जनप्रतिनिधींसाठी विशेष कार्यशाळा , तसेच " संविधान सप्ताह " साजरा करण्याची परंपराही वाढत आहे . म्हणूनच म्हणतात : " संविधान वाचलं की राष्ट्र जागतं , संविधान पाळलं की राष्ट्र बळकट होतं."**

भारतीय संविधानाचा जन्म : भारतातील संविधान निर्मिती ही केवळ कागदोपत्री प्रक्रिया नव्हती , तर स्वातंत्र्य संग्रामातील विचारधारांचे एकत्रीकरण , विविधतेतील एकता आणि सामाजिक न्याय यांचे मूळ तत्त्व एका चौकटीत बसवण्याचे जटिल आणि ऐतिहासिक कार्य होते . ९ डिसेंबर १९४६ रोजी राज्यघटना सभेची पहिली बैठक झाली . हिंदू , मुस्लिम , शीख , ख्रिश्चन , दलित , आदिवासी , शेतकरी , कामगार , उद्योगपती सगळ्या घटकांचे प्रतिनिधित्व या सभेमध्ये होते . त्यामुळे संविधान हे एका वर्गाचे नव्हे तर संपूर्ण राष्ट्राचे दस्तऐवज ठरले . आजही लोकशाहीचे मोठेपण सांगताना शासकीय कार्यक्रमांमध्ये ही विविधता विशेष उल्लेखली जाते विविधतेतील एकता ही आपल्या शासनाची व्यवस्थापन तत्त्वे झाली आहेत . संविधान सभेच्या प्रत्येक सत्राचा उल्लेख आज शैक्षणिक संस्थांमध्ये " संविधान यात्रा " किंवा " संविधान जनजागृती रथ " या मोहिमांद्वारे तरुणांना जिवंत स्वरूपात करून दाखवला जातो. डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : संविधान रचनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून डॉ . आंबेडकरांनी भारतीय समाजातील असमानता , जातीय अत्याचार , आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्याय यांचा जवळून अनुभव घेतला होता . त्यामुळे त्यांनी संविधानात न्याय , समता , स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये रोवली . त्यांच्या शब्दांत : " राज्यघटना कितीही चांगली असली तरी ती राबवणारे लोक चांगले नसतील तर ती निकृष्ट ठरते . " आजही हे वाक्य प्रशासन आणि राजकारणाला दिशा देते . शासनाकडून चालवल्या जाणाऱ्या " समता अभियान " , " सामाजिक न्याय सप्ताह " , " एक भारत श्रेष्ठ भारत " कार्यक्रमांतून संविधानात दिलेल्या मूल्यांचे प्रत्यक्ष शिक्षण लोकांपर्यंत पोहोचवले जाते . अनेक राज्यांत संविधान दिनानिमित्त अनुसूचित जाती - वर्ग , महिलांसाठी कायदेशीर साक्षरता शिबिरेही आयोजित केली जातात . आंबेडकरी विचारांच्या प्रसारासाठी शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून विविध योजनांना बळ मिळते. प्रस्तावनेचे महत्व : " आम्ही भारताचे लोक " ही प्रस्तावनेची सुरुवातच भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे . प्रस्तावनेत न्याय , स्वातंत्र्य , समता आणि बंधुता ही मूलभूत मूल्ये दिलेली आहेत . सामाजिक , आर्थिक आणि राजकीय न्याय ; विचार , अभिव्यक्ती , विश्वास आणि उपासनेचे स्वातंत्र्य ; संधीची समानता ; आणि बंधुता ही प्रस्तावना भारताची ओळख आणि लोकशाहीचे स्वरूप ठरवते . संविधान दिनी देशभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये प्रस्तावना पठणाचा कार्यक्रम घेतला जातो . शाळांमध्ये " माझी प्रस्तावना माझा अभिमान " अशी शपथ घेतली जाते . अनेक जिल्हा प्रशासनांकडून ' घटनादूत ' उपक्रम राबवून गावागावात संविधानाची प्रत आणि प्रस्तावनेची फ्रेम वाटप केली जाते . हिंदीतील एक सुंदर ओळ अचूक बसते : " संविधान हमारा दीपक है , जो अंधेरे में भी राह दिखाता है." मूलभूत अधिकार : संविधान प्रत्येक नागरिकाला सहा प्रमुख मूलभूत अधिकार देतो समानतेचा अधिकार , स्वातंत्र्याचा अधिकार , शोषणविरोधी अधिकार , धार्मिक स्वातंत्र्य , सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आणि घटनात्मक उपचारांचा अधिकार . डॉ . आंबेडकर यांनी घटनात्मक उपचारांच्या




अधिकाराला संविधानाचे " हृदय आणि आत्मा " म्हटले आहे . शासनामार्फत " कायदे जाणून घ्या हक्क जपा " , " विधी साक्षरता मोहीम " , " सायबर सुरक्षा जागरुकता " , " बालहक्क अभियान " , " महिला सुरक्षा सप्ताह " यांसारखे उपक्रम सतत राबवले जातात. मूलभूत कर्तव्ये : अधिकारांसोबत संविधानाने नागरिकांना ११ कर्तव्येही दिली आहेत . राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान , स्त्री पुरुष समानतेचा आदर , सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण , वैज्ञानिक दृष्टिकोन , बंधुता ही कर्तव्ये लोकशाही बळकट ठेवतात . शासनाच्या " स्वच्छ भारत " , " नारी शक्ती " , " हर घर तिरंगा " , " वृक्षलागवड जनचळवळ " अशा उपक्रमांतून कर्तव्यांची जाणीव नागरिकांपर्यंत पोहोचते . म्हण आहे : कर्तव्य पाळणारा नागरिकच खरा राष्ट्रभक्त. भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये : भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे आहे . यात २५० पेक्षा जास्त कलमे , १२ अनुसूच्या आणि विस्तृत रचना आहे . त्याची वैशिष्ट्ये संघराज्य पद्धतीत केंद्र व राज्य यांचे संतुलन , स्वतंत्र न्यायव्यवस्था , सर्वांसाठी मतदानाचा हक्क , धर्मनिरपेक्षता , सामाजिक न्यायाचा आग्रह , निवडणूक आयोग , वित्त आयोग , नियंत्रक आणि महालेखापरीक्षक , मानवाधिकार आयोग यांसारख्या संस्था . आज डिजिटल भारत , आधार प्रणाली , ई शासन , जनधन योजना , थेट लाभ हस्तांतरण हे सर्व संविधानातील मूल्यांवर उभे आहे. २६ नोव्हेंबर संविधान दिन का महत्वाचा ? : संविधान दिन लोकशाहीतील सक्रिय सहभागाची आठवण करून देतो . या दिवशी प्रस्तावना वाचन , संविधान ज्ञान स्पर्धा , घटनादूत रॅली , न्यायालयांमध्ये उघड न्यायालय दिवस , राज्यशासनामार्फत ' सुशासन सप्ताह ' अशा उपक्रमांतून लोकशाहीचा सण साजरा केला जातो. आजच्या काळात संविधानाचे महत्व अधिक : सोशल मीडिया , डिजिटल माहिती , दिशाभूल करणारी माहिती , पर्यावरणीय संकटे , सामाजिक तणाव या सर्वांमुळे संविधानातील मूल्ये पाळणे अधिक गरजेचे आहे . अभिव्यक्ती स्वातंत्र्य , समता , न्यायप्रक्रिया , मानवाधिकार यांमुळेच आजचा भारत मजबूत लोकशाही म्हणून उभा आहे . एक प्रभावी हिंदी ओळ येथे शोभते : " देश चलता है संविधान से . "भारतीय लोकशाहीचे सामर्थ्य : ९० कोटींपेक्षा जास्त लोक मतदान करतात , लाखो कर्मचारी निवडणुका पार पाडतात हे संविधानाने दिलेल्या चौकटीमुळे शक्य झाले . निवडणूक आयोगाचा " माझा मत माझा हक्क " , " मतदार जागरुकता अभियान " हे लोकशाहीला आणखी बळकटी देतात. आव्हाने : भारताने प्रगती केली असली तरी सामाजिक विषमता , जातीय तणाव , आर्थिक दरी , बेरोजगारी , पर्यावरणीय प्रश्न ही आव्हाने कायम आहेत . यांना तोंड देताना संविधानच मार्गदर्शक ठरते . शिक्षण , डिजिटल सुविधा , पायाभूत सुविधा , महिला सक्षमीकरण या क्षेत्रांतील सरकारी सुधारणा संविधानाच्या उद्दिष्टपूर्तीसाठीच आहेत. भविष्याची दिशा : भावी लोकशाही सक्षम करण्यासाठी संविधान शिक्षण , जबाबदार अभिव्यक्ती , न्यायव्यवस्था आणि मीडिया यांची स्वायत्तता जपणे अत्यावश्यक आहे . शासनाच्या " युवा चेतना अभियान " , " डिजिटल नागरिकता अभियान " यातून ही जाणीव तरुणांमध्ये रुजते. संविधान हे देशाचा पाया , लोकशाहीचा श्वास आणि भारताच्या आत्म्याचे आरसे आहे . २६ नोव्हेंबर आपल्याला सांगतो हक्कांचा वापर करा , पण कर्तव्येही पाळा . न्याय , समता , स्वातंत्र्य , बंधुता ही मूल्ये मनात ठेवूनच भारत पुढे जातो .

**" मातीचा सुगंध संविधानात ,**
**स्वातंत्र्याचा श्वास प्रत्येक शब्दात .**
**न्याय समतेचा दिवा उजळू दे ,**
**भारताचा मार्ग प्रकाशू दे . "**

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

## परतूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) शिवसेना (उबाठा) यांच्यात महायुती कायम

# बाबुरावजी हिवाळे सारखा विश्वासू सच्चा माणूस नगराध्यक्ष पाहिजे-महेश नळगे

**परतूर । प्रतिनिधी**

**परतूर तालुक्यातील नगरपालिका निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने परतुरयेथे खुप मोठ्या प्रमाणात राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या असून परतूर येथे काही दिवसापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट) शिवसेना( उ बा ठा) व वंचित बहुजन आघाडी यांच्यात महाविकास आघाडी झाली होती,मात्र जागे वाटापा वरून थोडा वाद रंगला असता, शिवसेना जिल्हा प्रमुख महेश भैया नळगे आणि मा.आमदार सुरेश कुमार जेथलिया यांनी पत्रकार परिषद घेऊन वंचित बहुजन आघाडी वगळता महायुती कायम ठेवल्याचे पत्रकार परिषदेत स्पस्ट केले, ३० वर्ष नगरसेवक असलेले प्रामाणिक सच्चा कार्यकर्ते बाबुरावजी हिवाळे**




**यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही शिवसेना (उबाठा ) पूर्ण ताकदीने, बाबुरावजी हिवाळे यांच्या सोबत थाट उभा आहे आणि राहणार, बाबुरावजी सारख्या सर्व जाती समभाव मनमिळावू नेर्तृत्व सच्चा माणूस, नगराध्यक्ष पदावर व्यक्ती पाहिजे,शिवसेना (उबाठा) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) आम्ही पूर्ण ताकदीने परतूर नगरपालिका निवडणूक लढवणार आहोत असे बोलत होते.**

मा.आमदार सुरेशकुमारजी जेथलिया यांच्या ३० वर्षी एकहाती सत्ता असल्यामुळे त्यांना परतूरचे किंगमेकर असे बोलले जाते, शहरातील साठे नगर परिसरत राहणारे दलीत चळवळीच्या माध्यमातुन सामाजीक चळवळीचा वणवा पेटवणारे बाबुराव हिवाळे यांना प्रभाग क्र ११ (अ) मधुन नगरसेवक पदाची तर त्यांच्या पत्नी सौ.शांताबाई बाबुराव हिवाळे यांना परतुर नगराध्यक्ष पदाची उमेदवारी राष्ट्रवादी अजित पवार (सुरेशकुमार जेथलिया गटा) कडुन मिळाली आहे. या अटीतटीच्या निडणुकीत नेमकी कोण बाजी मारेल याकडे सर्वाचेच लक्ष लागून आहे. मात्र जेथालिया यांनी एकप्रकारे बाबुराव हिवाळे सारख्या सच्च्या कार्यकर्तेला न्याय दिला अशी चर्चा शहरात ऐकायला मिळत आहे. गेल्या अनेक वर्षापासुन मा.आ. सुरेशकुमार जेथलिया यांच्या खांद्याला खांदा लावत बाबुराव हिवाळे यांनी त्यांच्या राजकीय प्रवासात त्यांचा सारथी म्हणुन आजवर काम पाहिले. याबरोबरचं आपल्या प्रभागासह बाबुराव हिवाळे यांनी समाजचळवळीत आपला वेगळा परिचय निर्माण दाम्यंत्याला उमेदवारी मिळाल्याने केला आहे. सर्वच समाजात हवे हवेसे असणारे बाबुराव हिवाळे यांनी आजवर सर्वाच्या कामी येत जनसामान्यात हक्काचे स्थान निर्माण केले. गेली पंधरा वर्ष त्यांनी नगरसेवकपद व पंधरा वर्ष त्यांच्या पत्नी सौ. शांताबाई हिवाळे यांनी नबरसेविका म्हणून काम पाहत आजवर राजकीय प्रवासात आपला सामाजीक परिचय दिला आहे. परतुरच्या इतिहत प्रथमचं नगराध्यक्ष पदा ची जागा अनुसुचित जाती महिला साठी राखीव सुटल्याने अनेकांना बाबुराव हिवाळे व शांताबाई हिवाळे यांच्या कार्याची आठवण होत पालीकेचे किंग मेकर मा.आ. सुरेशकुमार जेथालिया हिवाळे तांईना संधी देतिल असा आत्मविश्वास वाटला. शहरात राजकीय वातावरण चांगलेचं तापले असल्याने उमेदवारी नेमकी कुणाला मिळेल याकडे सर्वाचेच लक्ष होते. व अपेक्षे प्रमाणे बाबुराव हिवाळे यांच्या पत्नी सौ. शांताबाई बाबुराव हिवाळे यांना नगराध्यक्ष पदाची व प्रभाग ११ अ ची नगरसेवक पदाची उमेदवारी बाबुराव हिवाळे यांना जाहिर करण्यात आली. याबाबत सर्वानांच यांचा आंनद झाला असुन परतुर पालीकेच्या नगराध्यक्ष म्हणुन सौ. शांताबाई हिवाळे यांना संधी हवी या भावनेतुन सर्व कार्यकर्त्योंनी कंबर कसली आहे.

## पान १ वरून...

### मतदारयादी दुरुस्तीचे

दुबार नावे, मतदारांची नावे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात गेल्याच्या तक्रारी आल्या होत्या. यावरून थेट निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्ष, मतदारांनी तक्रारी केल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत यादीतील चुकांची दुरुस्ती करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे, स्थानिक पातळीवरील हरकती आणि चुकांचे निराकरण आता आयुक्तांना करावे लागणार आहे. पुण्यात मतदारयादीवर सर्वाधिक हरकती आल्या असून बहुतांश हरकती मतदारांची नावे प्रभागा बाहेर गेल्याच्या तसेच बाहेरील मतदार समाविष्ट झाल्याच्या आहेत. मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर येत आहेत. त्याची तपासणी करून संबंधित मतदार योग्य प्रभागात समाविष्ट झालेत की नाही याची खातरजमा करणे आवश्यक आहे. चुकीची नोंद आढळल्यास त्या मतदारांना योग्य प्रभागात समाविष्ट करून अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्याच्या सूचना दिल्या आहेत. हे बदल करताना केवळ बी.एल.ओ. किंवा तत्सम कर्मचाऱ्यांच्या अहवालावर विसंबून न राहता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पडताळणी करून नोंदी सुधाराव्यात. तसेच, अशा तक्रारींचा निपटारा दुसऱ्याच दिवशी करावा, असे स्पष्ट निर्देश आयुक्तांना दिले आहेत.

------------

### निवडणूक आरक्षणासंबंधी

आणि त्या आमच्या आदेशांनुसार करू. आम्ही एक मोठे पीठ देखील स्थापन करू शकतो, असे सरन्याधीश सूर्य कांत यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी वरिष्ठ वकील शेखर नाफाडे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात असे काही भाग आहेत जेथे ९० टक्के ओबीसी समाज आहे. नंदुरबार जिल्हा हा त्यापैकी एक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने म्हटले आहे की, मतदारसंघातील लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असावे. मग ५० टक्क्यांचा फरक आहे. पण काही भागात ९९ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. काय करावे?, असा सवालही त्यांनी केला. यावेळी अॅड. जयसिंग यांनी सांगितले की, देशात १९३१ नंतर जातीय जनगणना झालेली नाही. त्यामुळे आता ओबीसींच्या टक्केवारीचे मुल्यांकन करण्यासाठी केंद्र सरकारने जातीय जनगणना जाहीर केली आहे.

-----------

### ५०० वर्षांचा संकल्प

हा ध्वज निश्चय, यश आणि संघर्षाचं प्रतिक आहे. शेकडो वर्षांच्या संघर्षाचं प्रतिक आहे. हा ध्वज येणारी हजोरो वर्षे प्रभू रामांच्या मुल्यांची उद्घोषणा करेल. सत्य हाच धर्म आहे. आता कोणताही भेदभाव किंवा वेदना नाही तर शांतता आणि आनंद आहे. आता कोणीही गरीब राहणार नाही, मदतीशिवाय राहणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, आपल्या धर्मग्रंथात जेवढं महत्व मंदिराला आहे तेवढंच ते त्यावरील ध्वजाला आहे. जे मंदिरात जाऊन दर्शन घेऊ शकत नाहीत ते ध्वजासमोर नतमस्तक होतात. त्याला देखील तेवढीत किंमत आहे. हा ध्वज दूरूनच रामलल्लाच्या जन्मस्थानाची झलक देईल आणि भगवान श्रीरामाचे आदेश आणि प्रेरणा सर्व मानवतेला युगोयुगोपर्यंत पोहोचवत राहील. या अविस्मरणीय क्षणी मी जगभरातील कोट्यवधी रामभक्तांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. मी आज सर्व भक्तांना वंदन करतो. राम मंदिराच्या उभारणीत ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्या प्रत्येकाचे मी आभार मानतो. राम मंदिराच्या बांधकामात सहभागी असलेल्या प्रत्येक मजूर, कारागीर, नियोजक, वास्तुविशारद आणि कामगारांचे मी अभिनंदन करतो. याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची स्थापना करण्याचा प्रयत्न केला. आपण गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर येणं गरजेचं आहे. प्रभू रामचंद्र हे एक व्हॅल्यू सिस्टम आहेत. आपण मानसिक गुलामगिरीतून बाहेर पडण्याचा संकल्प करायला हवा. २०४७ पर्यंत भारताला विकसीत देश होण्याचं स्वप्न पूर्ण करण्यापासून कोणालाही रोखू शकत नाही असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

---------

### अजित पवारांच्या ताफ्यातील गाडीच्या

जण रस्त्यावर फेकले गेले. तातडीने स्थानिकांनी तत्परता दाखवत जखमींना धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तत्काळ लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. कुसुम सुदे यांची स्थिती अत्यंत नाजूक होती. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, परंतु गंभीर दुखापतींमुळे उपचार सुरू असतानाच त्यांची २५ रोजी सकाळी प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने सुदे कुटुंबात तसेच संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. दोन निष्पाप मुलींसह संपूर्ण कुटुंब एका क्षणात उद्ध्वस्त झाल्याने स्थानिक नागरिकांनी या अपघाताची चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, जखमी विष्णु सुदे यांना उपचारासाठी पुणे येथे हलवण्यात आले आहे. दोन्ही मुलींवर उपचार सुरू करून प्रकृती ठिक असल्याने त्याना सुट्टी देण्यात आली आहे. या हृदयद्रावक घटनेने ताफ्यातील वाहनांचा वेग आणि सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे केले आहे. या अपघात केलेल्या वाहणावर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सहायक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यानी सांगीतले.

---------

### जातीच्या अधारावर समाजाचे विभाजन

परंतू आता जनगणना प्रस्तावित असून, त्यातून ओबीसींची लोकसंख्येची टक्केवारी निश्चित करण्यास मदत करेल, असे देखील जयसिंग म्हणाल्या. यावेळी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी ओबीसींना पूर्णपणे वगळता येत नसल्याचे मान्य केले व ओबीसींना वगळून लोकशाही कशा प्रकारे स्थापित केली जावू शकते असा सवाल देखील उपस्थित केला.

--------------

### नवीन कामगार कायद्यांमुळे

कामगारांची संख्या ७५.५ टक्क्यांवर पोहोचेल. सध्या देशातील ४४ कोटी लोक असंघटित क्षेत्रात काम करतात. यापैकी २० टक्के कामगार अनौपचारिक पगारावरून औपचारिक पगाराकडे वळल्यास सुमारे १० कोटी व्यक्तींना नोकरीची सुरक्षितता, सामाजिक संरक्षण आणि इतर औपचारिक रोजगाराच्या लाभांचा थेट फायदा मिळेल. अहवालात असेही नमूद केले आहे की, सामाजिक क्षेत्रातील व्याप्ती ८५ टक्क्यांपर्यंत वाढू शकते, ज्यामुळे देशाची कामगार परिसंस्था मजबूत होईल. अहवालानुसार, या सुधारणांमुळे दररोज प्रति व्यक्ती सुमारे ६६ रुपयांनी उपभोग वाढेल, ज्यामुळे मध्यम कालावधीत एकूण ७५,००० कोटी रुपयांची उपभोग वाढ होईल. यामुळे देशांतर्गत खर्च आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल. एसबीआयने नमूद केले आहे की, भारतात सध्या सुमारे ४४ कोटी लोक असंघटित क्षेत्रात काम करतात, त्यापैकी सुमारे ३१ कोटी कामगार ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत आहेत. यापैकी २० टक्के कामगार अनौपचारिक वेतनातून औपचारिक वेतनाकडे जातात असे गृहीत धरल्यास, सुमारे १० कोटी व्यक्तींना सुधारित नोकरी सुरक्षा, सामाजिक संरक्षण आणि औपचारिक रोजगार लाभांचा थेट फायदा होऊ शकतो.

-------------

### गौरी गर्जेची आत्महत्या नसून

असेल तर ती जिथे काम करत होती तिथल्या तिच्या मैत्रिणींनी सुद्धा जबाब दिला आहे, त्यांना विचारा. तिने आत्महत्या केली नाही, असा आमचा ठाम विश्वास आहे. आत्महत्या केला तर खुण पाहिजे. आत्महत्या केल्यावर लॉक तोडतात, पोलीस येतात, नातेवाईक येतात, मग पंचनामा होतो. तुम्ही नातेवाईक येण्याआधी पंचनामा केला. एवढी गडबड का केली? हँगिग झालेला माणूस जिवंत राहू शकतो का? असे सवाल अशोक पालवे यांनी केले.

# आयुक्त संतोष खांडेकर यांचा जामीन अर्ज मंजुर

**जालना । प्रतिनिधी**



जालना महापालिकेचे प्रशासक संतोष खांडेकर यांचा जामीन अर्ज उच्च न्यायालयाच्या मुंबई- संभाजीनगर खंडपीठाने काही विशेष अटी लावून मंजुर केला आहे. कंत्राटदारांच्या कामाचे बिल काढण्यासाठी आयुक्त खांडेकर यांनी वीस लाख रुपयांची मागणी केली होती. जालना महापालिकेचे प्रशासक संतोष खांडेकर यांना दहा लाख रुपयांची लाच घेताना पकडण्यात आले. कंत्राटदाराचे बिल काढण्यासाठी त्यांनी वीस लाख रुपयांची मागणी केली होती. विशेष न्यायालयाने त्यांचा जामिनाचा अर्ज फेटाळला होता. आज मुंबई- संभाजीनगर खंडपीठाने काही विशेष अटी लावून त्यांचा जामीन अर्ज मंजुर केला आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५
३

## थोडक्यात



शिरूर कासार :-तालुक्यातील चाहुरवाडी येथील शेतकरी कुटुंबातील नितीन भोलाजी खेंगरे यांची उपजिल्हाधिकारीपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथ वनवे,आप्पासाहेब येवले,गोकुळ सानप व इतर.

## नगरपरीषद निवडणूक मतदानासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण संपन्न



किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदान अधिकारी व कर्मचारी यांचे दुसरे प्रशिक्षण दिनांक २५/११/२०२५ रोजी दीनदयाल उपाध्याय नाट्यगृह धारूर येथे आयोजित करण्यात आले होते निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार श्रीकांत निळे व सहाय्यक निवडणूक अधिकारी मुख्याधिकारी अजित ढोपे यांनी कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले तसेच तहसीलदार राकेश गिड्डे यांनी उपस्थित राहून सर्व मतदान अधिकारी व कर्मचारी विशेष मार्गदर्शन केले नायब तहसीलदार सुरेश पाळवदे, नजीर कुरेशी, प्रकाश गोपड, सोपान वाघमारे मंडळ अधिकारी यांनी प्रशिक्षण चे नियोजन केले १५० कर्मचारी प्रशिक्षणास उपस्थीत होते.

## मंजरथ-माजलगाव बससेवा नियमित करण्याबाबत रिपब्लिकन सेनेचे निवेदन



माजलगाव । प्रतिनिधी

मंजरथ ते माजलगाव दरम्यानची बस वाहतूक अनियमित असल्याने नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीची दखल घेत रिपब्लिकन सेनेच्या वतीने माजलगाव आगार व्यवस्थापकांना औपचारिक निवेदन सादर करण्यात आले.निवेदन स्वीकृत करताना आगारप्रमुख कोळेकर साहेब यांनी प्रतिनिधीमंडळाशी सविस्तर चर्चा केली. सद्यस्थितीत या मार्गावर केवळ एक फेरी सुरू असून, पुढील दोन दिवसांत पाच नियमित फेऱ्या सुरू करण्यात येतील अशी लेखी माहिती त्यांनी प्रदान केली. तसेच नव्या वेळापत्रकाची घोषणा लवकरच करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. निवेदन सादर करताना उपस्थित रिपब्लिकन सेना तालुका उपाध्यक्ष संतोष खुणे युवा नेते सचिन पाडमुख माजी ग्रा.प. सदस्य संदीपान डोंबाळे काशिनाथ थोरात बाबासाहेब डोंगरे भद्रगें मामा इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नाथापूर-पिंपळनेर रोडवर पहाटे धडक कारवाई

## अवैध वाळू वाहतूक करणारा टेम्पो जप्त - महसूल विभाग झाला सतर्क




बीड । प्रतिनिधी

नाथापूर पिंपळनेर रोडवरील खंडेश्वरी मंदिरजवळ , पॉलिटेक्निक कॉलेज परिसरात महसूल विभागाने २५ नोव्हेंबर रोजी पहाटे २ वाजता गुप्त माहितीच्या आधारे राबविलेल्या धडक कारवाईत अवैध वाळू वाहतूक करणारा टेम्पो जप्त केला . तांबड्या रंगाचा टेम्पो क्रमांक चक १६ -ध ८५१२ यामध्ये अंदाजे १ ब्रास वाळू आढळून आली . चालकाकडे वाहतूक परवाना विचारणा केली असता कोणताही वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाले . वाहन मालकाचे नाव आरबाज बेग रईस बेग रा . खासबाग , ता . जि . बीड असल्याचे चालकाने सांगितले.

महसूल प्रशासनाला काही दिवसांपासून सिंधफणा नदीकाठी कुर्ला , कुक्कडगाव , भाटसांगवी परिसरात बेकायदेशीर वाळू उपसा सुरू असल्याच्या तक्रारी मिळत होत्या . त्यानुसार पथकाने रात्री उशिरापर्यंत गुप्त पाळत ठेवली . संशयित वाहनाने वेगाने पलायनाचा प्रयत्न करताच पथकाने निर्धाराने ५ किलोमीटरपर्यंत पाठलाग केला . अखेर नाथापूर पिंपळनेर रोडवर सापळा रचून वाहनाला वेढा देत पकडण्यात यश आले . अचानक तपासणीमध्ये कोणतीही परवानगी किंवा परवाना नसताना वाळूची वाहतूक होत असल्याचे उघड झाले. पथकाने वाहन व वाळू जप्त करून पुढील कार्यवाहीसाठी ते तहसील कार्यालय बीड येथे लावण्यात आले . महाराष्ट्र जमीन महसूल कायदा व वाळू नियमांनुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरातील वाळू माफियांना स्पष्ट इशारा गेला आहे . नैसर्गिक संसाधनांची लूट , नदीपात्र धूप , शेतीचे नुकसान , पाणीपुरवठ्यावर परिणाम आणि शासन महसुलाला फटका अशी गंभीर परिस्थिती निर्माण करणाऱ्या अवैध उत्खननावर आळा बसणार असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले की कोणीही बेकायदेशीर वाळू उत्खनन , वाहतूक अथवा विक्री करू नये . प्रशासनाकडे माहिती असल्यास त्वरित कळवावी . वाळू माफियांना कुठलाही पाठीशी घालण्यात येणार नाही. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नागरिकांना सहकार्याचे आवाहन करत सांगितले की अवैध उत्खननामुळे जलस्रोत आणि पर्यावरण धोक्यात येते . कायद्याचे पालन करणे ही सर्वांची जबाबदारी आहे . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी इशारा देत म्हटले की सिंधफणा परिसरात तपास मोहिमा सुरू राहतील . कुणीही गैरप्रकारात सामील असल्यास कठोर कारवाई टाळता येणार नाही. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने राबविल्या जाणार आहेत . कोणीही अवैध रित्या वाळूची वाहतूक करू नये , कायद्याचे पालन करावे , संशयास्पद हालचाली दिसल्यास महसूल विभागास कळवावे.ही कारवाई जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या आदेशानुसार नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , ग्राम महसूल अधिकारी दादा शेळके , विकास ससाणे , विजय बहीर , विलास शिंदे , खांडेकर एम . व्ही . , यशवंत सानप यांच्या पथकाने केली. बीड जिल्हा प्रशासन सज्ज असून अशा धाडसी कारवाया पुढेही सुरू राहणार आहेत, असे जिल्हा गौण खनिज अधिकारी नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

## वारकरी संप्रदायाला मिळणार इंग्रजीमध्ये शिक्षण, आष्टीच्या माऊली मंदिर परिसरात भव्य दिव्य इंग्लिश स्कूल उभारणार

**आष्टी । प्रतिनिधी**

**जून २०२६ महिन्यामध्ये आष्टी येथील माऊली मंदिर याठिकाणी वारकरी शिक्षण संस्था सुरू करणार असून त्यामध्ये विशेषतः इंग्रजी भाषेतून शिक्षण मिळावे या अनुषंगाने इंग्लिश चपकनी संस्था आणि मराठी वारकरी संस्था अशा सुरू करण्याची घोषणा आष्टी, पाटोदा, शिरूरचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी केली आहे. आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथे बाळूमामाच्या मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे बोलत होते.**



इंग्लिश भाषेतील वारकरी

आष्टीत इंग्रजी संस्था आणि मराठी भाषेतील वारकरी संस्था अशा दोन्ही सुरू करून आपण वारकरी संप्रदायातील संस्कार आणि ज्ञानाची ध्वज आणि पताका जगभर नेणार आहोत. माजी आमदार भीमराव धोंडे यांनी ही घोषणा केली आणि उपस्थित हजारो भाविक भक्तांनी त्यांच्या घोषणेचे प्रचंड टाळ्या वाजवून स्वागत केले. यासंदर्भात पुढे बोलताना माजी आ.भीमराव धोंडे म्हणाले की, इंग्लिश वारकरी संस्था करण्याचा उद्देश असा आहे की, जर महाराष्ट्राच्या बाहेर आणि देशाच्याही बाहेर आपल्या वारकरी संप्रदायाचे संस्कार, अभंग आणि साहित्य पोहोचवायचे असेल तर इंग्रजी भाषेतूनसुद्धा कीर्तनकार तयार झाले पाहिजेत आणि या कीर्तनातून आपल्या महाराष्ट्र भूमीतील संतांचे विचार देशभर आणि जगभर पोहोचले पाहिजेत असे सांगीतले. यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, ह.भ.प. दादा महाराज चांगुणे, युवा नेते धैर्यशील थोरवे, सरपंच सावता ससाणे, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, अशोक ढवन, जगन्नाथ ढोबळे, सदा पाटील दिंडे, चेअरमन दादासाहेब हजारे, दादासाहेब झांजे, मोहन चोपडे आदि उपस्थित होते.

माजी आ. भीमराव धोंडे यांच्या घोषणेचे स्वागत !

आज आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथे संत बाळूमामांच्या मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे यांनी आपल्या मनोगत प्रसंन घोषणा केली. इंग्रजी आणि मराठी भाषेतून संत साहित्य जा पोहोचण्याचा या संकल्पनेचे उपस्थित तालुक्यातील भाविक भक्तांनी स्वागत करून धोंडे यांच्या संकल्पनेला टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

पान ६ वरुन...

### विकासाचा नवा अध्याय

समस्या दिसून आल्या रस्ते नाहीत, सगळीकडे धुळच धुळ हे जिरवा जिरवी मुळे घडत आहे. एकाने निधी आणला तर दुसऱ्याने हाणून पडायचा दोघांच्या भांडणात योजना बंद पडल्या आहेत. इथे जी लढाई सुरू आहे सत्तेची आणि स्वार्थाची, मात्र तुम्हाला विकासाची लढाई करायची आहे. प्रस्थापितांच्या विरोधात ही विकासाची लढाई आहे

लाडकी बहीण योजना बंद करण्याचे अनेक प्रयत्न केले, पण कोणीही आला तरी ही योजना बंद पडणार नाही ही योजना मी मुख्यमंत्री असताना सुरू झाली, ही बंद पडणार नाही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री असलो तरी लाडका भाऊ हेच पद मला महत्त्वाचे आहे. नगर विकास खाते एकनाथ शिंदे कडे आहे, शहरात चांगले गार्डन, रस्ते दिल्या शिवाय राहणार नाही. धनुष्यबाणाला निवडून द्या असे आवाहन शिंदे यांनी केले मी मुख्यमंत्री असताना या जिल्ह्याला अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिले शिवसेना नेहमी ॲक्शन मोडवर असते, स्पॉट डिसिजन असते म्हणजे कॉमनमॅन म्हणजे डेडिकेटेल कॉमन मॅन यावेळी शिवसेनेचे सर्व उमेदवार मंचावर उपस्थित होते. पायल आकाश बाफना यांनी प्रचारात घेतलेली आघाडी आणी आणी उभे केलेले आव्हान हा यावेळी चर्चेचा विषय होता.

### धारूरमध्ये नगराध्यक्षपदासाठी

कामांची प्रगती पाहणार आहे. भोपाळप्रमाणे धारूर शहरही स्वच्छ ठेवण्यासाठी विशेष मोहिम राबवली जाईल. ग्रामीण रुग्णालयाचा रस्ता, शहरातील मूलभूत सुविधा, महिला गृहउद्योग यावरही प्रामाणिकपणे काम केले जाईल, असे ही त्यांनी सांगीतले .

डॉ . हजारी यांचा ठाम विश्वास .

डॉ. हजारी यांनीही आपली भूमिका मांडली. त्यांनी पालीकेला मिळालेले विभागीय व राज्यस्तरीय स्वच्छता प्राविण्य प्रमाणपत्र, नियमित पाणीपुरवठा, छत्रपती संकुल उभारणी यांसारख्या कामांची माहिती देत विरोधकांनी केलेले आरोप फेटाळून लावले. भ्रष्टाचार सिद्ध झाला तर मी माझा व्यवसाय बंद करेन, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला

### मांजरसुंबा महामार्ग

फाटा येथे मागून आलेल्या कारने जोराची धडक दिली. धडकेमुळे ते जागीच ठार झाले. अपघातानंतर कार काही अंतरावर जाऊन थांबली. कारचा चालक लहू वासुदेव आंधळे असल्याचे समोर आले असून कारमध्ये पोलिसांचा गणवेश मिळाल्याने तो राज्य राखीव पोलीस दलात कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. या संपूर्ण घटनेची माहिती प्रत्यक्षदर्शी सुनील बबन चौरे यांनी पाटोदा पोलिसांना दिल्यानंतर आंधळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सलग अपघातांमुळे मांजरसुंबा महामार्गावर सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### पापा मोदी हे अंबाजोगाईच्या

विकासाचा ब्रँण्ड आहेत. प्रलोभन, आमिष यांना बळी पडून काही जणांनी बेडूक उड्या मारल्या आहेत. गद्दार कोणाचेच नसतात. ज्यांच्याकडे गेले त्यांचेही ते होवू शकत नाहीत. नेते गेले पण, जनता आमच्या सोबत आहे. दादांनी पापासेठ यांना शब्द दिलाय की, अंबाजोगाईच्या विकासाला निधीची कमतरता पडू देणार नाही. अंबाजोगाईला बारामती सारखे सुजलाम सुफलाम शहर करायचे असेल तर आपण सर्वांनी पापासेठ यांना सहकार्य करावे, मतदानरूपी आशीर्वाद द्यावेत. लोक विकास महाआघाडीच्या सर्वच उमेदवारांना निवडून द्यावे. २०११ साली अंबाजोगाई विकास आघाडी असतानाही जनतेने पूर्ण बहुमताचा आशीर्वाद पापा मोदींना दिला होता. तेव्हाही सभेला आजच्यासारखी रेकॉर्ड ब्रेक गर्दी झाली होती.

### भाजप उमेदवारांच्या समर्थनार्थ

विकास कामे करण्यासाठी चांगल्या नेतृत्वाची आवश्यकता असते,म्हणून नगराध्यक्ष पदासाठी डॉ ज्योती घुंबरे यांना उमेदवारी दिली आहे,भाजपा उमेदवारांच्या माध्यमातून हा विकास नियोजित दृष्टिकोन ठेऊन निश्चितपणे पुढे जाईल,पेठ बीड भागातून आम्हाला सातत्याने पाठबळ राहिले आहे,जे जे उमेदवार दिले आहेत ते सक्षम आहेत त्यामुळे जनतेचे मूलभूत प्रश्न सुटू शकतील,असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सर्वांनी संघटितपणे काम करण्याचे आवाहन केले. बैठकीत प्रभाग क्र. ३ चे उमेदवार अमृत सारडा, कु. अश्विनी गोरख मोमीन; प्रभाग क्र. ४ चे प्रेम चांदणे, सौ. मीनाताई अशोक जाधव; प्रभाग क्र. ५ मधील श्रीमती मीनाबाई रणजितसिंह चौहान, प्रकाश कानगावकर; तसेच प्रभाग क्र. १६ चे उमेदवार परसराम जाधव व सौ. मुक्ता बाबूलाल ढोरमारे उपस्थित होते. यासोबतच परिसरातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून भाजपच्या उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी हजारो नागरिक मतदार उपस्थित होते

### उसाला भाव मागणाऱ्या

भास्कर माने, नंदकुमार राधाकिसन शिंदे, यांच्याविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम कलम २२३ ,१८९ (२) १२६ (२) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कायदा हातात घेऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारा कोणीही असला तरी त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल. असा स्पष्ट संदेश पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी दिला आहे.

## खाडे यांचा संविधानदिनी आत्मदहनाचा इशारा ; प्रशासनाकडून दुर्लक्षाचा आरोप

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील प्रकाश खाडे यांनी आपल्या प्रलंबित तक्रारीवर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत उद्या संविधान दिनाच्या निमित्ताने राज्यपाल भवनासमोर आत्मदहन करण्याचा गंभीर इशारा दिला आहे.**

प्रकाश खाडे यांनी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी संबंधित विभागाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रारीवर कारवाई न झाल्याने त्यांनी विविध अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. या अनुषंगाने तहसील कार्यालय, पाटोदा यांनी त्यांच्या तक्रारीची सुनावणी घेतली आणि त्यांचे म्हणणे मनपूर्वक ऐकून घेतल्याबद्दल खाडे यांनी समाधान व्यक्त केले. तथापि, उपविभागीय कार्यालय, पाटोदा व एचडीएम कार्यालय यांनी केलेल्या पत्रव्यवहाराकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप खाडे यांनी केला आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार-

२१० दिवसांपासून पत्रव्यवहार प्रलंबित

एचडीएम कार्यालयाकडून कोणतीही सुनावणी न घेणे

२५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत कोणताही प्रतिसाद प्राप्त न होणे

उपविभागीय कार्यालयात उपस्थित राहून कर्मचाऱ्यांकडे लेखी निवेदन दिले तरी दुर्लक्ष

या सर्वांचा निषेध करत प्रकाश खाडे यांनी सांगितले की जबाबदार अधिकाऱ्यांनी त्यांच्या गंभीर तक्रारीचा विचार केला नाही, ज्यामुळे त्यांनी कठोर निर्णयाचा इशारा देण्यास भाग पाडले आहे. प्रकाश खाडे यांनी राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे उद्या संविधान दिनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला असून त्यामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. घटनेचा पुढील तपास सुरू असून संबंधित अधिकाऱ्यांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही.

## नांदेवली येथे खंडोबा यात्रेचे आयोजन गुरुवारी कुस्त्यांचा फड रंगणार

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील नांदेवाली येथील ग्रामस्थांचे श्रद्धास्थान असलेली श्री खंडोबा देवाची पारंपरिक यात्रा यावर्षी चंपाषष्ठी उत्सवानिमित्त बुधवार, दि. २६ पासून मोठ्या उत्साहात सुरू होत आहे. परिसरातील गावांमधून मोठ्या संख्येने भाविक दाखल होणार असून संपूर्ण नांदेवली गाव भक्तीभावाने दुमदुमून गेले आहे.

यात्रेपूर्वी ग्रामस्थांच्या वतीने धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे विशेष नियोजन करण्यात आले आहे. पालखी मार्ग, कुस्ती मैदान आणि गावाचा परिसर स्वच्छतेने सजला असून वाहतूक व्यवस्था तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. गावातील श्री खंडोबा मंदिर आकर्षक फुलांनी सजविण्यात आले असून नित्यपूजा, विविध नैवेद्य व भजन-कीर्तनांच्या कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. 'येळकोट येळकोट जय मल्हार!' या जयघोषांनी संपूर्ण गाव उत्साहात निनादत आहे. मंगळवार, दि. २५ रोजी यात्रेची सुरुवात नागदिवा कार्यक्रमाने झाली. बुधवार, दि. २६ हा यात्रेचा मुख्य दिवस असून पारंपरिक तळी-भंडारा कार्यक्रम सर्व घराघरात साजरा केला जातो. भरीत-रोडगा नैवेद्य दाखवून ग्रामस्थ वांगे-कांदे खाण्याची प्रथा पाळतात. सायंकाळी श्री खंडोबा देवाचा भव्य छबिना ढोल-ताशा, बँड पथके आणि पारंपरिक वेशभूषेत संपूर्ण गावातून मिरवला जाणार आहे. त्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांसाठी आयोजित करण्यात आली आहे.

यात्रेचे मुख्य आकर्षण असलेल्या कुस्त्यांचा जंगी फड गुरुवार, दि. २७ रोजी रंगणार आहे. राज्यातील नामांकित पैलवान या मैदानात हजेरी लावणार असून प्रेक्षकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. विजेत्या पैलवानांना रोख बक्षिसे देण्यात येणार असून तरुणांमध्ये या स्पर्धांविषयी विशेष उत्सुकता पाहायला मिळत आहे.

## धनगर जवळका येथे प्राणी मित्रांनी वाचवले हरणाचे प्राण

पाटोदा । प्रतिनिधी

धनगर जवळका शिवारामध्ये आज रात्री नऊ वाजता एक गाडीने हरणाला जोरदार धडक दिल्याची माहिती मिळताच गावातील सर्व मित्रमंडळी तात्काळ घटनास्थळी धावून पोहोचली. घटनास्थळी पोहोचल्यावर हरण जखमी अवस्थेत रस्त्याच्या खालील खड्ड्यात पडलेले आढळले. मित्रमंडळींनी कोणताही विलंब न करता हरणाला सुरक्षितपणे बाहेर काढले.



या प्रकरणाची माहिती मजूर शहादेव पवार यांनी फोनवरून दिली होती. तत्काळ वन विभागाचे पगार प्रभारी अधिकारी देवगुड साहेब यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण परिस्थिती सांगण्यात आली. त्यांनी हरणाला उपचारासाठी सर्पराज्य प्रकल्प, शिरूर कासार येथे पाठवण्याच्या सूचना दिल्या.

वन विभागाच्या सूचनेनुसार तातडीने वाहनाची व्यवस्था करण्यात आली आणि हरणाला सुखरूपपणे सर्पराज्य प्रकल्प, शिरूर कासार येथे रवाना करण्यात आले. त्या हरणासोबत वन मधून नागरगोजे यांचेही साथ लाभली. या संपूर्ण बचाव मोहिमेत गावातील अनेक युवकांनी पुढाकार घेत अमूल्य सहकार्य केले. त्यामध्ये अजित काळे, सावकार काळे, अविनाश काळे, सागर गाडेकर, शंकर गोरे, नाना ढेकळे, वसंत गाडेकर यांचे विशेष योगदान राहिले. या कार्यात ज्यांनी मदतीचा हात पुढे केला त्या सर्व मित्रांचे मनःपूर्वक आभार. गेल्या वर्षी त्या जागेवर एक हरणाला अज्ञात वाहनाने धडक दिली होती त्यावेळी सर्व गावकऱ्यांनी मिळून आम्ही त्या हरणाचे प्राण वाचवले होते व रात्रीही सर्वांच्या प्रयत्नातून त्या हरणाला जीवदान भेटले

## श्रीक्षेत्र दत्त संस्थान बालाघाट येथे दत्त जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र दत्त संस्थान, बालाघाट येथे यावर्षीही मार्गशीर्ष पौर्णिमेनिमित्त दत्त जन्मोत्सव सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. प.पू. ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने आणि दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा दिव्य सोहळा पार पडणार आहे.

दिनांक २७ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत गुरुचरित्र पारायण, श्रीची महाआरती, भजन यांसारखे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

मुख्य कार्यक्रम गुरुवार, ४ डिसेंबर २०२५ रोजी पार पडणार असून, या दिवशी दत्त मूर्ती महाअभिषेक, गोमाता पूजन, भक्तिगीत आणि इतर धार्मिक विधींचे आयोजन आहे. सोहळ्यानिमित्त उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.



या उत्सवासाठी अन्नदाता म्हणून अशोक कल्याण जगताप, योगेश परमेश्वर चव्हाण (उदंड वडगाव, शिवाजीनगर) तसेच श्रीदत्त संस्थान बालाघाट, कपिलधारवाडी (मांजरसुंबा) यांनी सहकार्य केले आहे.

संस्थानतर्फे पंचक्रोशीतील सर्व भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दत्तकृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

२७ नोव्हेंबर ते ४ डिसेंबरदरम्यान गुरुचरित्र पारायण

सालाबाद प्रमाणे यावर्षीही सात दिवसांचे गुरुचरित्र पारायण सुरू राहणार आहे. दररोज पारायणासोबत श्रीची महाआरती, भजन यांसारखे भक्तिमय कार्यक्रम आयोजीत केले असून, परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. भाविकाणी दररोज पारायणासाठी उपस्थित राहून दत्तभक्तीचा लाभ घ्यावा.

भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था

सोहळ्यानिमित्त पंचक्रोशीतील तसेच दूरदूरून येणाऱ्या सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. मार्गशीर्ष पौर्णिमा आणि दत्तजन्मोत्सव या दुग्धशर्करा पर्वानिमित्त भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे.

भाविकांना आवाहन

पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी या सोहळ्यात सहभागी होऊन दत्तकृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे. दत्तभक्तीचा हा पवित्र उत्सव सहकार्याने व भक्तिभावाने साजरा होणार, आहे.

# शेतकऱ्यांना १ रुपये किलोनं केळी विकण्याची वेळ; शहरात एक डझनला ६० ते ७० रुपये

सध्या देशातील केळी उत्पादक शेतकरी संघटता आहे. कारण केळीच्या दरात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. बाजारा केळीच दर अधिक आहेत, मात्र, शेतकऱ्यांकडून कमी दरात केळीची खरेदी होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. शहरांमध्ये एक डझन केळीसाठी ६० ते ७० रुपये द्यावे लागतात. मात्र, दुसऱ्या बाजुला शेतकऱ्यांकडून १ रुपये किलो दरानं केळीची खरेदी होताना दिसत आहे. आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांवर १ रुपये किलो दराने केळीची विक्री करण्याची वेळ आली आहे. भरपूर उत्पादनासाठी ओळखल्या जाणाऱ्या अनंतपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आता बाजारात विकण्याऐवजी त्यांचे उत्पादन रस्त्यावर फेकून द्यावे लागत आहे. ज्या केळीची गोडवा एकेकाळी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचला होता, त्यांची किंमत आता फक्त १ रुपया प्रति किलो आहे.

२८ हजार किमतीचे उत्पादन १००० रुपयांना

अनंतपूर जिल्ह्यातील परिस्थिती सध्या गंभीर आहे. केळीची मागणी इतकी जास्त होती की सरकारने देशाच्या कानाकोपऱ्यात आणि परदेशात माल पोहोचावा यासाठी ताडीपत्री येथून एक विशेष ''केळी ट्रेन'' देखील सुरू केली. पण आज, तेच शेतकरी संकटता आहेत. एक टन केळीची किंमत २८००० रुपये होती, परंतु आता ती फक्त १००० पर्यंत घसरली आहे. जर तुम्ही गणित केले तर, घाऊक बाजारात एक किलो केळीची किंमत फक्त १ रुपये किलो आहे. एका वर्षाच्या कठोर परिश्रमानंतर, जेव्हा पीक तयार होते, तेव्हा बाजारपेठेने शेतकऱ्याच्या कष्टाचे असे मूल्य दिले आहे. हा मोठा फरक का निर्माण झाला आहे? शेतकरी याची दोन मुख्य कारणे सांगतात, ज्यामुळे त्यांचे कंबरडे मोडले आहे.



बाजारपेठेवर मजबूत पकड निर्माण करणारे मध्यस्थ शेतकऱ्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेत आहेत. ते कवडीमोल किमतीत पीक खरेदी करत आहेत, तर जेव्हा तेच केळी ग्राहकांपर्यंत पोहोचते तेव्हा ते ५०-६० पट महाग होतात.

दुसरे प्रमुख कारण म्हणजे शेजारच्या महाराष्ट्र राज्यातून येणारी केळीची मोठी खेप. या वर्षी, तेथे उत्पादनात भरघोस पीक आले आहे, ज्यामुळे बाजारात उत्पादनाचा जास्त पुरवठा झाला आहे. याचा थेट परिणाम अनंतपूरच्या शेतकऱ्यांच्या मागणी आणि किमतीवर झाला आहे.

परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की शेतकऱ्यांना त्यांच्या बागा नष्ट करण्याशिवाय पर्याय नाही. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा वाहतूक खर्च बाजारपेठेत भरावा लागत आहे, तर त्यांना तिथे मिळणारा भाव नगण्य आहे. म्हणूनच त्यांनी पिकलेले धान्य ट्रॅक्टरवर लादून रस्त्याच्या कडेला टाकण्यास सुरुवात केली आहे. लोकांच्या ताटात पोहोचायला हवे होते ते केळी आता रस्त्याच्या कडेला असलेल्या गुराढोरांसाठी आणि प्राण्यांसाठी अन्न बनत आहेत. निराशा इतकी वाढली आहे की अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या उभ्या पिकांवर ट्रॅक्टर आणि बुलडोझर चालवले आहेत. ते त्यांच्या हिरव्यागार बागा स्वतःच्या हातांनी सपाट करत आहेत, कारण त्यांना आता कापणीचा खर्चही वसूल करणे कठीण होत आहे.

# हरभऱ्याचे काबुली वाण व त्यांची वैशिष्ट्ये



हरभरा हे रब्बी हंगामातील कमी पाण्यावर येणारे कडधान्य पीक आहे. मानवी आहारात या पिकाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. हरभऱ्याच्या काबुली वाणास बाजारात चांगला दर मिळत असल्याने अनेक शेतकरी काबुली हरभऱ्याची लागवड करतात. हरभऱ्याची पेरणी १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत करता येते.

काबुली वाण : विराट - हा वाण ११० ते ११५ दिवसांत तयार होतो. जिरायतीमध्ये सरासरी ११ क्विंटल प्रति हेक्टर तर बागायती क्षेत्रामध्ये सरासरी १९ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळते. अधिक टपोरे दाणे व मर रोगास प्रतिकारक्षम वाण आहे. १०० ग्रॅम दाण्यांचे वजन ३५ ग्रॅम मिळते.

कृपा - या वाणाचा कालावधी १०५ ते ११० आहे. मर रोगास प्रतिकारक्षम असून सफेद पांढरे दाणे आहेत. बागायतीमध्ये १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळते. या वाणापासून जास्त टपोरे दाणे मिळतात. पीकेव्हीके-२ - हा वाण १००-१०५ दिवसात काढणीस येतो. मर रोगास प्रतिकारक्षम असून अधिक टपोरे दाणे मिळतात. १०० ग्रॅम दाण्यांचे वजन ४० ग्रॅम मिळते. बागायती क्षेत्रात या वाणापासून सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते. पीकेव्ही- ४ - हा वाण मररोगास प्रतिकारक्षम आहे. या वाणापासून अधिक टपोरे दाणे मिळतात.

हा वाण १०० ते ११० दिवसांत तयार होतो. प्रतिहेक्टरी सरासरी १२ ते १५ क्विंटल उत्पादन मिळते बीडीएनजीके-७९८ - उभट पसरणारा हा वाण असून मध्यम आकाराचे दाणे असतात. हा वाण मररोग व खुजारोगास मध्यम प्रतिकारक्षम आहे. या वाणाचा कालावधी ११० ते ११५ दिवस आहे. या वाणापासून सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.

# रेशीम कीटकावरील उझी माशीचे एकात्मिक नियंत्रण

रेशीम कीटकांवर उपजीविका करणारी परोपजीवी कीड उझी माशी ही रेशीम उद्योगात नुकसानकारक ठरते. या किडींचा प्रादुर्भाव कमी अधिक प्रमाणात दिसून असून, उझी माशीच्या प्रादुर्भावामुळे कोषाचे १५ ते २० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. त्यामुळे उझी माशीच्या नियंत्रणासाठी वेळीच उपाययोजना करण्याची आवश्यकता असते. उझी माशीचा प्रादुर्भाव वाढण्याची कारणे : रेशीम कीटक संगोपनामध्ये वाढ होत असून, उझी माशीस सातत्याने अन्नाची उपलब्धता होत आहे. अनेक रेशीम उत्पादक दोन बॅचेसमध्ये १५ ते २० दिवसांचा खंडही ठेवत नाहीत. प्रौढ माशीचा जीवन कालावधी १२ ते १८ दिवसांचा असून, त्या ४०० ते ५०० अंडी देतात. निसर्गातील उझी माशींच्या शत्रूकीटकांची संख्या विविध कारणांमुळे कमी होत आहेत. उझी माशीवरील परोपजीवी निसोलीनक्स थायमस या मित्रकीटकांचे संवर्धन करण्याची आवश्यकता आहे.

नुकसान कालावधी : उझी माशीचा प्रादुर्भाव वर्षभर आढळत असला, तरी ऑगस्ट ते नोव्हेंबर या दरम्यान जास्त प्रादुर्भाव राहतो. बदलता पाऊस, तापमान आणि आर्द्रतेनुसार उझी माशीची अंडी देण्याची क्षमता बदलते. पावसाळा आणि हिवाळ्यात उझी माशीचा जास्त प्रमाणात प्रादुर्भाव आढळतो. उन्हाळ्यात ३२ ते ४२ अंश सेल्सिअस तापमानामुळे मार्च ते जून महिन्यात उझी माशीचा प्रादुर्भाव कमी दिसून येतो.

जीवनक्रम : चार अवस्था : अंडी, छोटी अळी (मॅगट), कोष, प्रौढ माशी. उझी माशी एका वेळी ४०० ते ५०० पांढऱ्या दुधाळ रंगाची अंडी देते. उझी माशीची मादी १ ते २ अंडी वाढीच्या चौथ्या किंवा पाचव्या अवस्थेत असलेल्या रेशीम अळीच्या त्वचेत टाकते. अंड्यातून ४८ ते ६२ तासांत (२ ते ३ दिवस) मॅगट बाहेर येते. आपल्या छातीजवळ असलेल्या हूकच्या



साह्याने छिद्र करून रेशीम अळीच्या शरीरात शिरतात. त्या ठिकाणी काळा डाग पडतो. फिक्कट पिवळसर अळी अवस्था ६ ते ८ दिवसांची राहते. अळीचे लालसर तपकिरी कोषात रूपांतर होते. कोषावस्था १० ते १२ दिवसांची असते. अशा प्रकारे उझी माशीचा जीवनक्रम १८ ते २२ दिवसात पूर्ण होतो. प्रादुर्भावाची लक्षणे : रेशीम अळ्यांच्या शरीरावर काळे डाग दिसतात.कोषाच्या टोकाला गोलाकार छिद्र दिसते. रेशीम कोष तयार झाल्यास संगोपन ट्रेमध्ये उझी माशीचे तपकिरी रंगाचे कोष दिसतात.

उझी माशी नियंत्रण : उझी माशीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी एकात्मिक पद्धतीचा वापर करणे गरजेचे आहे. अ) मशागतीय पद्धत : राज्यात जवळपास ९८ टक्के कच्चे शेडनेट संगोपनगृह आहेत. शक्यतो पक्के सिमेंट कॉंक्रीटमध्ये बांधकाम करून शिफारशीप्रमाणे दरवाजे खिडक्या आणि हवा खेळती राहण्यासाठी व्यवस्था करावी. तुती पाने साठवण करण्यासाठी वेगळी अंधारी खोली असावी. फांदी खाद्य देण्याअगोदर उझी माशी फांद्या किंवा पानांद्वारे सरळ संगोपनगृहात प्रवेश करते. रेशीम कीटकांच्या दोन बॅचेसमध्ये कमीत कमी १५ दिवसांचे अंतर ठेवावे. कोष विक्री केलेल्या बाजारातून पोते घरी आणू नये. कारण या सोबत उझी माशीच्या अळ्या, कोष आपल्या संगोपनगृहात येण्याची शक्यता असते.

रेशीम कीटकांची विष्ठा शेतात उघड्यावर न फेकता खताच्या (कंपोस्ट) खड्ड्यात गाडून टाकावी. कारण विष्ठेत उझी माशीच्या सुप्त अवस्था (कोष) असतात. प्रादुर्भावग्रस्त गावात एप्रिल ते मे महिना कोषाचे पीक बंद ठेवावे.ब) यांत्रिक पद्धत : संगोपन गृह, कोष खरेदी केंद्र, धागानिर्मिती केंद्र अशा सर्व ठिकाणी अळ्या, कोष गोळा करून जाळून नष्ट करावेत. या सर्व ठिकाणच्या जमिनीच्या भेगा बुजवून घ्याव्यात. प्रौढ रेशीम कीटक संगोपनगृह ८२ २३ उंची १५ फूट आकाराच्या संगोपनगृहासाठी (२५० अंडी पुंजासाठी) ७-८ कामगंध सापळे लावावे. संगोपनगृहाच्या बाहेरून २० फूट अंतरावर लावलेल्या या कामगंध सापळ्यातील गंधगोळीकडे (ल्यूअर) नर माश्या आकर्षित होन अडकतात. परिणामी, नर मादीच्या गुणोत्तर बिघडून प्रजनन प्रक्रियेत अडथळा येतो. सर्व खिडक्या व दरवाजांना नायलॉन वायर मेश जाळी लावून घ्यावी. म्हणजे उझी माशी कीटक संगोपनगृहात सरळ प्रवेश करणार नाही. गोळा केलेल्या अळ्या, कोष डिटर्जंटच्या द्रावणात टाकून नष्ट करावेत. रेशीम कीटकाच्या तिसऱ्या अवस्थेपासून पुढे उझी माशीचे सापळे कोष विणन काळापर्यंत रॅकवर लावावेत.क) जैविक पद्धत : उझी माशीच्या कोषावरील परोपजीवी निसोलायनक्स थायमस हे परोपजीवी कीटक संगोपनगृहात रेशीम कीटकांनी चौथी कात टाकल्यानंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी सोडावेत. १०० अंडीपुंजांसाठी परोपजीवी कीटकांचे दोन पाऊच लागतात. रेशीम कीटक कोषावर गेल्यानंतर निसोलायनक्स थायमस परोपजीवी कीटकांचे पाऊच चंद्रिकेजवळ ठेवावेत. कोष काढणीनंतर खताच्या खड्ड्याजवळ ठेवावेत. हे पाऊच रेशीम संशोधन योजना, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्याकडे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. आधी पैसे भरून मागणी केल्यास कुरियरनेही पाठवले जातात. अशा प्रकारे एकात्मिक पद्धतीचा वापर केल्यास रेशीम कोषाचे होणारे नुकसान टाळता येईल.

# सेंद्रिय शेतीत बदल घडवणारा उपाय- जीवामृत ट्यूब

सेंद्रिय शेती ही आता पर्याय न राहता काळाची गरज बनली आहे. रासायनिक शेतीमुळे जमिनीत जीवसृष्टी नष्ट होत आहे, सुपीकता कमी होत आहे आणि उत्पादनाचा खर्च वाढत आहे. अशा परिस्थितीत सेंद्रिय शेतीकडे वळणारे शेतकरी वाढत आहेत. मात्र, सेंद्रिय शेतीत आवश्यक असणाऱ्या जीवामृताची वेळेत आणि योग्य प्रमाणात निर्मिती ही मोठी अडचण ठरते.

हीच समस्या ओळखून विकसित करण्यात आले आहे जीवामृत ट्यूब. हे एक अभिनव तंत्रज्ञान आहे, ज्याच्या मदतीने शेतकरी कमी वेळात, कमी मेहनतीत आणि कमी खर्चात अधिक गुणवत्तापूर्ण जीवामृत तयार करू शकतात.

जीवामृत का आवश्यक आहे : जीवामृत हे नैसर्गिक खत जमिनीत सूक्ष्मजीवांची संख्या वाढवते. हे सूक्ष्मजीव मातीतील पोषकतत्त्वांचा विघटन वेग वाढवतात, ज्यामुळे पिकांना सहज उपलब्ध होतात. याचा थेट परिणाम म्हणजे पिकांची मुळे अधिक बळकट होतात. पाने गडद हिरवी राहतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. उत्पादनाचा दर्जा सुधारतो. तथापि, पारंपरिक पद्धतीने जीवामृत तयार करताना वेळ, जागा, सतत देखरेख आणि योग्य प्रमाण राखणे यासारख्या समस्या येतात. जीवामृत ट्यूब या समस्यांवर अत्यंत प्रभावी उपाय ठरते.

जीवामृत ट्यब अशी काम करते : ही ट्यूब सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक अशा जीवनसत्त्वांनी



आणि सूक्ष्मजीवांनी समृद्ध असलेले जीवामृत तयार करण्याची प्रक्रिया अधिक सोपी करते. फक्त १० ते १२ दिवसांत दर्जेदार जीवामृत तयार होते, जे ड्रीप सिंचन, फवारणी किंवा पाट पाण्यातून सहज वापरता येते.

जीवामृत ट्यूबच्या वापराचे फायदे : कमी वेळेत अधिक प्रमाणात व दर्जेदार जीवामृत तयार होणे. कमी खर्चामुळे रासायनिक खतांवरील अवलंबन कमी होणे. जमिनीचा पोत सुधारून भुसभुशीतता वाढणे. पीक मुळे अधिक बळकट होणे आणि पोषणतत्त्वांचे शोषण सुधारणे. पिकांची प्रतिकारशक्ती वाढून रोग व कीटकांपासून नैसर्गिक संरक्षण मिळणे. जीवामृत ट्यूब वापरल्याने शेतात झालेले बदल. ट्यूब वापरल्यावर अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात लक्षणीय बदल अनुभवले आहेत.

काही प्रमुख बदल पुढीलप्रमाणे आहेत : पिकांच्या उत्पादनात सरासरी १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. रासायनिक खतांवरील खर्च ४० ते ६० टक्क्यांनी कमी झाला आहे. मातीची सुपीकता आणि पाणी धारण करण्याची क्षमता वाढली आहे. पिकांचा दर्जा सुधारला असून फळांचा आकार, चव आणि रंग अधिक आकर्षक झाला आहे. रासायनिक फवारणींची गरज कमी झाल्याने पर्यावरणीय तणावही कमी झाला आहे.

ट्यूबची वैशिष्ट्ये : विविध आकार व मॉडेल्स उपलब्ध. ९०० प्लास्टिक पासून तयार केली जाते. ऊन, पाऊस, वारा आणि बुरशी यांचा कोणताही परिणाम होत नाही. डास, माश्या किंवा दुर्गंधीचा त्रास होत नाही. १०० टक्के वॉटरप्रूफ आणि तीन वर्षांची वॉरंटी सुविधा. बाजारात जीवामृत बनवणाऱ्या खूप साऱ्या कंपन्या उपलब्ध आहेत परंतु, सर्टिफाईड असणारी उष्णतेपासून बॅक्टरियाचा बचाव करणारी वारंवार ब्लॉकेज न होणारी ही एकमेव जीवामृत ट्यूब आहे.

सेंद्रिय शेतीसाठी योग्य पर्याय : जीवामृत ट्यूब केवळ एक साधन नसून शेतकऱ्यांसाठी शाश्वत शेतीकडे नेणारा विश्वासाचा दुवा आहे. या ट्यूबच्या मदतीने शेतकरी कमी खर्चात आणि कमी मेहनतीत अधिक उत्पादन घेऊन नफा वाढवू शकतात. तसेच, रासायनिक खतांवरील अवलंबन कमी करून पर्यावरणासही अनुकूल योगदान देऊ शकतात.




## जागतिक दिवस: शाकाहार दिन

### महत्वाच्या घटना

१६६४ : छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याचा पाया घातला.
१७५८ : ब्रिटन या देशाने आजच्याच दिवशी फ्रांस च्या डोक्विन्सोन या किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून किल्ला काबीज केला होता.
१८६७ : अल्फ्रेड नोबेल या शास्त्रज्ञाने आजच्या दिवशी डायनामाईट चे पेटंट केले होते.
१९२२ : मधुमेह या आजारावरील इन्सुलिन चा शोध फ्रेडरिक बँटिंगनी यांनी जाहीर केला.
१९४१ : आजच्याच दिवशी लेबेनॉन या देशाला फ्रांस या देशाकडून स्वातंत्र्य मिळाले होते.
१९४८ : नेशनल कॅडेट कोर्सची स्थापना.
१९६५ : आजच्याच दिवशी फ्रांस या देशाने स्वतःचा पहिला उपग्रह अवकाशात सोडला होता.
१९७५ : सुरीनामला नेदरलँड्सकडून स्वातंत्र्य मिळाले.
१९७५ : सुरीनामला (नेदरलँड्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९८१ : अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियमवर पहिला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला गेला.
१९९१ : कमल नारायण सिंग यांनी भारताचे २२ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९४ : राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांना कलकत्ता येथील 'इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशन'तर्फे देण्यात येणारा 'राज क्रिस्टो दत्त स्मृती पुरस्कार' जाहीर
१९९९ : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे यांना 'इंदिरा गांधी शांतता पुरस्कार' जाहीर
२००० : सतारवादक उस्ताद अब्दुल हलीम जाफर खाँ यांना मध्यप्रदेश सरकारचा 'तानसेन सन्मान' जाहीर
२००१ : आजच्याच दिवशी वरिष्ठ पाकिस्तानी राजनेता बेनजीर भुट्टो या तत्कालीन भारतीय प्रधानमंत्रीअटल बिहारी वाजपेयीयांना दिल्ली येथे भेटल्या होत्या.
२००२ : लुसिया गुटेरेज आजच्याच दिवशी इक्वाडोर या देशाचे राष्ट्रपती म्हणून नियुक्त झाले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४१ : जर्मन गणितज्ञ आर्न्स्ट श्रोडर यांचा जन्म.
१८४४ : मर्सिडीज-बेंझ चे संस्थापक कार्ल बेंझ यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १९२९)
१८७२ : कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ख्यातनाम नाटककार व पत्रकार, 'केसरी'चे संपादक, 'नवाकाळ'चे संस्थापक (मृत्यू: २६ ऑगस्ट १९४८)
१८७९ : साधू वासवानी आध्यात्मिक गुरु व शिक्षणतज्ञ (मृत्यू: १६ जानेवारी १९६६)
१८८२ : सावळाराम लक्ष्मण हळदणकर चित्रकार (मृत्यू: ३० मे १९६८)
१८८९ : आध्यात्मिक गुरु व शिक्षणतज्ञ साधू वासवानी यांचा जन्म. (मृत्यू: १६ जानेवारी १९६६)
१८९० : प्रसिध्द साहित्यकार सुनीती कुमार चाटर्जी यांचा जन्म झाला होता.
१८९८ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि पटकथालेखक देबाकी बोस यांचा जन्म.
१९८२ : प्रसिध्द भारतीय महिला क्रिकेट खेळाडू व वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामी हिचा आजच्याच दिवशी जन्म झाला होता.
१९८३ : भारतीय क्रिकेटर झुलन गोस्वामी यांचा जन्म.
१९२१ : नटवर्य भालचंद्र पेंढारकर यांचा जन्म.
१९२६ : रंगनाथ मिश्रा भारताचे २१ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १३ सप्टेंबर २०१२)
१९३५ : महाराष्ट्रीय हॉकीपटू गोविंद सावंत यांचा जन्म.
१९३७ : शिक्षणतज्ज्ञ साधू वासवानी यांचा जन्म.
१९३९ : उस्ताद रईस खान मेवाती घराण्याचे गायकी अंगाने वाजवणारे सतारवादक
१९५२ : इम्रान खान पाकिस्तानी क्रिकेटपटू व राजकारणी
१९६३ : लोकसभा सदस्य अरविंद कुमार शर्मा यांचा जन्म झाला होता.
१९६९ : त्रिपुरा राज्याचे १० वे मुख्यमंत्री विप्लव कुमार देव यांचा आजच्या दिवशी जन्म झाला होता.
१९७२ : भारतीय क्रिकेटपटू दीपा मराठे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८५ : अल्फान्सो (बारावा) स्पेनचा राजा (जन्म: २८ नोव्हेंबर १८५७)
१९२२ : पांडुरंग दामोदर गुणे प्राच्यविद्यासंशोधक, भाषाशास्त्रज्ञ व साहित्यसमीक्षक (जन्म: २० मे १८८४ राहुरी, अहमदनगर, महाराष्ट्र)
१९६० : अनंत सदाशिव अळतेकर प्राच्यविद्यापंडित (जन्म: २४ सप्टेंबर १८९८)
१९६२ : गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ 'दासगणू महाराज' आधुनिक संतकवी, 'भक्तिरसामृत', 'भक्तकथामृत' आणि 'संतकथामृत' हे त्यांचे संतचरित्रात्मक ग्रंथ आहेत. (जन्म: ६ जानेवारी १८६८ अकोळनेर, अहमदनगर)
१९७४ : यू. थांट संयुक्त राष्ट्रांचे तिसरे सरचिटणीस (जन्म: २२ जानेवारी १९०९)
१९८४ : यशवंतराव चव्हाण भारताचे ५ वे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (जन्म: १२ मार्च १९१३)
१९८७ : परम वीर चक्र सन्मानित भारतीय सैनिक मेजर रामास्वामी पारामेस्वरण यांचे निधन झाले होते.
१९९८ : परमेश्वर नारायण तथा पी. एन. हक्सर प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव, योजना आयोगाचे उपाध्यक्ष (जन्म: ४ सप्टेंबर १९१३ गुजरानवाला, पंजाब, पाकिस्तान)
२०१३ : लीला पोतदार तथा लीलावती भागवत बालसाहित्यिका. ओघवती भाषा, चित्रमय वर्णन व बोलकी संवादशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या 'स्वर्गाची सहल आणि इतर कहाण्या' या पुस्तकाचा 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने ११ भाषांत अनुवाद प्रसिद्ध केला. (जन्म: ५ सप्टेंबर १९२०)
२०१४ : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना, आणि कोरिओग्राफर सितारा देवी यांचे निधन. (जन्म: ८ नोव्हेंबर १९२०)
२०१६ : क्युबाचे क्रांतिकारक आणि पंतप्रधान फिडेल अलेहांद्रो कॅस्ट्रो रूझ यांचे निधन. (जन्म: १३ ऑगस्ट १९२६)

# अहिल्यानगरात मानव - बिबट संघर्ष रोखण्यासाठी प्रशासनाकडून व्यापक उपाययोजना

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून दैनंदिन आढावा

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर वनविभागातील वाढत्या मानव बिबट संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचनेनुसार जिल्हा प्रशासन व वन विभागामार्फत अल्पकालीन तसेच दीर्घकालीन स्तरांवर सर्वसमावेशक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या उपाययोजनांचा पालकमंत्री दररोज दूरध्वनीद्वारे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांच्याकडून आढावा घेत आहेत. अहिल्यानगर वनविभागात सुमारे १ हजार १५० बिबट्यांची अंदाजित संख्या असून ऊस, मका, नेपिअर गवत, फळबागांचे क्षेत्र व पाण्याची उपलब्धता यामुळे बिबट्यांचा अधिवास मानवी वस्तीजवळ निर्माण होत आहे. परिणामी संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून प्रशासनाने तात्काळ प्रतिबंधात्मक कारवाई सुरू केली आहे. बिबट्यांना तात्काळ जेरबंद करण्यासाठी राहुरी व संगमनेर येथे दोन प्रशिक्षित रेस्क्यू टीम तैनात आहेत.



अलीकडील काळात मानवावर हल्ला करणाऱ्या २३ बिबट्यांना पकडून सुरक्षित स्थळी ठेवण्यात आले आहे. खारेकरजुने परिसरातील दोन बिबट्यांना जेरबंद करून त्यांना माणिकडोह (ता. जुन्नर) येथील निवारा केंद्रात कायमस्वरूपाने ठेवण्यात आले आहे. तसेच कोपरगाव तालुक्यातील येसगावटाकळी परिसरातील नरभक्षक ठरलेल्या एका बिबट्याला १५ नोव्हेंबर २०२५ रोजी गोळी झाडून ठार करण्यात आले.

पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार जिल्हा नियोजनातून निधी उपलब्ध करून देण्यात आला असून या निधीतून ३०० पिंजरे, ३०० ट्रॅप-कॅमेरे, रेस्क्यू उपकरणे (जॅकेट, शूज, टॉर्च-गन, संरक्षणात्मक किट) आणि १४ रेस्क्यू वाहने खरेदी करण्यात आली आहेत. ट्रॅप-कॅमेऱ्यांद्वारे बिबट्यांच्या हालचालींची नोंद दैनंदिन घेतली जाते. संवेदनशील रस्त्यालगतचा झाडोरा हटवून रस्ते मोकळे करण्यात आले आहेत. वनविभागाने वारंवार घटना घडणारी ८९७ संवेदनशील गावे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कळविली असून त्यानुसार या गावांतील शाळांची वेळ बदलून सकाळी ९.३० ते सायंकाळी ४.०० अशी निश्चित करण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना पहाटे किंवा उशिरा सायंकाळी प्रवास करावा लागू नये. सध्या वनविभागाकडे ३०५ पिंजरे आणि ३ थर्मल ड्रोन उपलब्ध असून प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून त्यांचा वापर करण्यात येतो. राहुरी वनपरिक्षेत्रातील बारागाव नांदुर येथे वन्यप्राणी उपचार केंद्र ( फेज १) उभारणी अंतिम टप्प्यात असून जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण क्षमतेने सुरू होईल. याच ठिकाणी बिबट रेस्क्यू सेंटर स्थापन करण्याबाबत प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. मानवहल्ल्यात सहभागी, जखमी प्राणी तसेच पिल्ले येथे उपचारानंतर आवश्यकतेनुसार ठेवण्यात येणार आहेत. अहिल्यानगरातील बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन बिबट नसबंदी व रेडिओ फ्रिक्वेन्सीद्वारे ओळख होणारी सूक्ष्मचिप शरीरात प्रत्यारोपित करण्यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यात अतिरिक्त ठरणाऱ्या बिबट्यांना वनतारा (गुजरात) प्रकल्पासह इतर निवारा केंद्रांमध्ये कायमस्वरूपी स्थलांतरित करण्याबाबतही परवानगी मागितली आहे. यासंदर्भातील सुमारे ५०० बिबट्यांच्या टप्प्याटप्प्याने स्थलांतराचा प्रस्ताव वरिष्ठ पातळीवर विचाराधीन असल्याची माहिती वनविभागाने दिली आहे.

# नवीन तहसीलदार व पोलीस प्रमुख रुजू होताच वाळूसह अवैध धंदे सुरू

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यात नुकतेच नवीन तहसीलदार आणि नवनियुक्त पोलीस निरीक्षकांनी पदभार स्वीकारताच वाळू माफिया व मटक दारू फेक पत्ता असे अवैध धंदे सुरू झाले याप्रकरणी जिल्हाधिकारी श्रीमती आशिम मित्तल पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी लक्ष देऊन मंठा शहरासह ग्रामीण भागात कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे .तसेच वाळू-मुरूम यांसारख्या गौण खनिजाची रात्रंदिवस धडधडीत वाहतूक होताना दिसत असून, अवैध दारू, गुटखा, मटका इत्यादी बेकायदेशीर व्यवसायांनी पुन्हा एकदा तालुक्यात डोके वर काढले आहे.

नागरिकांमध्ये यामुळे प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. अवैध धंदेवाल्यांना स्थानिक प्रशासनाकडूनच पाठीशी घातले जात असल्याची गंभीर चर्चा सर्वत्र सुरु आहे.

संबंधित अधिकारी आणि माफियांची मिलीभगत असल्याने शासनाच्या महसुलाला कोट्यवधी रुपयांचा चुना लागतोय, तर दुसरीकडे वाढत्या अवैध धंद्यांमुळे




कायदा-सुव्यवस्थेवरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रक्षकच भक्षक झाल्याने मंठा तालुक्याची अवस्था भकास होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. सत्ता स्थानात कार्यरत काही राजकीय मंडळींच्या पाठिंब्यामुळे या माफियांवर कोणताही अधिकारी कठोर कारवाई करण्याची हिम्मत दाखवत नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी काही दिवसांपूर्वीच वाळू माफियांना आळा घालण्याचे स्पष्ट आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.

मात्र, हे आदेश धाब्यावर बसवून अवैध व्यवहार पूर्वीपेक्षा अधिक जोमात सुरू असल्याचे प्रत्यक्ष पाहायला मिळते. यामुळे नागरिकांत प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी मंठा तालुक्याचा गुप्त दौरा करून प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. वाळू-मुरूम उत्खनन, वाहतूक आणि इतर अवैध धंद्यांमध्ये सामील असलेल्या माफियांची शहानिशा करून त्यांच्यावरच नव्हे, तर त्यांना आश्रय देणाऱ्या तलाठी, मंडळ अधिकारी, तहसील प्रशासन आणि पोलीस अधिकाऱ्यांवरही कठोर गुन्हे दाखल करून तातडीने कारवाई करावी, असा जनतेचा सुर आहे. अवैध धंद्यांचे प्रमाण वाढत असल्याने भविष्यात मंठा तालुक्यात कायदा-सुव्यवस्था ढासळण्याची शक्यता नागरिक व्यक्त करीत असून, प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत अशी अपेक्षा आहे.

# जामखेड नगरपरिषदेसाठी महाविकास आघाडीच्या प्रचाराचा भव्य शुभारंभ

## आ.रोहित पवारांची जोरदार फटकेबाजी



जामखेड । प्रतिनिधी

जामखेड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०३० च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), महाविकास आघाडी आणि मित्र पक्षांच्या वतीने प्रचाराचा भव्य शुभारंभ जामखेड तहसील कार्यालयासमोर उत्साहात पार पडला. या सभेला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, सभेत उसळलेल्या गर्दीतून आगामी निवडणुकीत सत्ता परिवर्तनाचे स्पष्ट संकेत मिळाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. या सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार निलेश लंके, आमदार रोहितदादा पवार तसेच शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेला झालेली नागरिकांची अभूतपूर्व गर्दी आणि जोरदार घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

आमदार रोहित पवार यांनी आपल्या दमदार भाषणात महाविकास आघाडीच्या उमेदवारांची स्वच्छ प्रतिमा, उच्च शिक्षण आणि सर्वसामान्य कुटुंबातील पार्श्वभूमी यावर भर दिला. त्यांनी भाजपवर तीव्र टीका करत विरोधी उमेदवारांची कुंडलीच वाचून दाखवली. भाजपचे लक्ष विकासापेक्षा सत्तेवर कब्जा करण्यावर केंद्रीत असून या मतदारसंघात काँग्रेस भाजपची 'बी-टीम' बनली असल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच यापुढील काळात महाविकास आघाडी सत्तेत आल्यास फक्त एका वर्षात जामखेड शहरातील नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शहरातील बंद पडलेली कामे पूर्णत्वास नेण्याबाबतही त्यांनी ठाम भूमिका मांडली. दरम्यान, आपल्या भाषणातील धारदार शैलीत शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी विरोधकांवर टोकदार पलटवार करत शिक्षित, सुरक्षित आणि प्रगत पिढी हवी असेल तर आ.रोहित पवार यांच्यासोबत उभे रहा आणि मुलांना 'पिस्तुलीचे लायसन्स' हवे असेल तर राम शिंदे यांना मत द्या असे म्हणत राम शिंदे यांच्यावर जोरदार हल्ला केला. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी शासन योजनांच्या नावाखाली मत विकत घेण्याचा नवीन प्रयोग भाजप करत असल्याचा आरोप केला आणि नागरिकांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आ.रोहित पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहून महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. सभेतील उत्साह, घोषणाबाजी आणि उपस्थिती पाहता कार्यकर्ते आणि नागरिकांनी महाविकास आघाडीचा विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. या भव्य शुभारंभाने निवडणूक प्रचाराला जोमदार सुरुवात झाली असून, जामखेडच्या राजकारणात मोठा बदल घडणार असल्याचे वातावरण नागरिकांमध्ये जाणवत आहे.

# आरोप सिद्ध करा अन्यथा आ. रोहित पवार यांनी आमदारकीचा राजीनामा द्यावा - राळेभात

जामखेड । प्रतिनिधी

आ रोहित पवार यांनी काल केलेल्या आरोपांच माजी नगराध्यक्षा प्रिती राळेभात यांनी खंडण केले असुन अर्ज काढून घेण्यासाठी पैसे असल्याचा आरोप आ रोहित पवार यांनी केला सदरील आरोप आ रोहित पवार यांनी सिद्ध करुन दाखवावे आम्ही राजकारण सोडू अन्यथा रोहित पवार आमदारकीचा राजीनामा द्यावा असे आवाहन विकास राळेभात यांनी केला माजी प्रथम नगराध्यक्षा प्रिती विकास राळेभात यांच्या कडुन पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. यावेळी रुपाली राळेभात उपस्थित होते. अपक्ष उमेदवार नितुशा सदाफुले यांनी नगराध्यक्षांसाठी प्रिती विकास राळेभात यांना पाठींबा जाहीर केला,



यावेळी बोलताना प्रिती विकास राळेभात म्हणाल्या कि आम्ही जेव्हां नगरपरिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आम्ही पक्षाकडे मागणी केली तेव्हाही तिकीट दिले नव्हते आम्ही जनतेच्या स्वबळावर निवडणूक लढवली आम्ही निवडून आलो होतो. त्यानंतर नगराध्यक्षपदासासाठी भाजपकडून ऑफर आली होती मात्र आम्ही राष्ट्रवादीशी एकनिष्ठपणा ठेवत सत्ता राष्ट्रवादीकडे दिली आताही उमेदवारी मागितली उमेदवारी नाकारली मात्र अपक्ष म्हणून उमेदवारी करून जनतेचा मोठ्या प्रमाणावर पाठींबा मिळत असल्याचे पाहून त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे त्यामुळे विरोधक बेताल वक्तव्य करतात यावेळी बोलताना रुपाली मला कार्यकर्त्यांन सोबत गेले होतो प्रभाग ४ मधून राष्ट्रवादी कडून इच्छुक असताना आ रोहित पवार यांनी तुम्हाला सर्व पाठबळ देऊ तुम्ही तयारी करा असे सांगण्यात आले मात्र ऐनवेळेस माझी उमेदवारी काढण्यात आली त्यामुळे प्रभागात राष्ट्रवादीच्या उमेदवाराबाबत असंतोष निर्माण झाला आहे यावेळी विकास राळेभात म्हणले कि - मी एकनिष्ठ कार्यकर्ता आसुन सध्या माझ्यावर अन्याय झाला आहे. मित्रांच्या बळावर निवडुन आलो भाजप बोलवत आसताना देखील मी सुरेश धस यांचा कार्यकर्ता आहे दहेगाव पाणी योजना तपनेश्वर रस्ता ९६० घरकुल आणले आहेत. तुम्ही दहा वर्षे काय विकास केला.आ. रोहीत पवार यांनी मी विधानसभेच्या वेळी अर्ज मागे घेण्यासाठी त्यांच्या कडुन पैसै घेतले असा आरोप माझ्यावर भर सभेत केला होता. मात्र हा आरोप साफ खोटा आहे. आ. रोहित पवार हे खोटे बोलत आहेत. विधान सभेच्या वेळी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार मी आमदारकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र पुन्हा मराठा समाज महाराष्ट्रात वेगळा विधानसभा निवडणुक लढणार नाही असे त्यांनी सांगितले व उमेदवारी अर्ज मागे घेतला असताना त्याचा राग मनात ठेवला आम्ही सर्वानी राष्ट्रवादीचे काम केले मात्र निवडणुकीत निष्ठवंत कार्यकर्त्याला डावलण्यात आले याचा फटका येणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादीला बसल्याशिवाय राहणार नाही.

# प्रेमासाठी स्वतःच्या घरातच मुलीने केली दोन वेळा चोरी

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

कॉलनीत राहणाऱ्या एका मुलाच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या मुलीने आपल्याच घरात दोन वेळा चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एक वेळेस रोख रक्कम, तर दुसऱ्या वेळेस सोन्याचे दागिने पळवल्याचे समोर आले. सततच्या गैरवर्तनाला कंटाळलेल्या आईने मुलीविरुद्ध उस्मानपुरा पोलिस ठाण्यात तक्रार केली. या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.ही घटना हर्सूल परिसरातील होणाजीनगर येथे घडली असून, या १९ वर्षीय मुलीचे कॉलनीतील एका मुलासोबत प्रेमसंबंध जुळले. या प्रकरणाची माहिती दोन्ही कुटुंबांना मिळाल्यावर त्यांनी त्यांच्या संबंधांना विरोध केला. त्यामुळे प्रेमीयुगुलाने पळून जाण्याचा निर्णय घेतला. पळून जाण्यासाठी पैशाची गरज असल्याने मुलीने थेट घरातील ११ लाख रुपयांची रोकड सोबत घेऊन प्रियकरासोबत पळ काढला. दरम्यान, दोन्ही कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेणे सुरू होते. इकडे या युगुलांकडील पैसेही संपले मग त्या दोघांनी परत घर जवळ केले.

# कचरा जाळ्याप्रकरणी१० हजाराचा दंड वसूल करून दोघाविरुद्ध गुन्हा दाखल

जालना । प्रतिनिधी

जालना शहरात अनधिकृत कचरा जाळल्या प्रकरणी सिंकदर जिलानी शेख यांना ५०००/- रूपये ,शेख जुबेर शेख लाला याना ५०००/- रूपये दंड आकारून पोलीस स्टेशन कदीम जालना येथे संबंधिताविरुध्द रितसर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरील कारवाई जालना महानगरपालिकेकडून करण्यात आली. दंडात्मक कार्यवाहीसह कचरा जाळणा-या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये रितसर गुन्हा दाखल करण्यात आला दिनांक- २३/११/२०२५ रोजी सांयकाळी विशाल कॉर्नर ते बसस्टँड जालना कडे जात असतांना धूर निघत असल्याच व्हिडीओ जालना शहर महानगरपालिकेला प्राप्त झाला होता. त्यानुसार मा. आयुक्त तथा प्रशासक, मा. अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त जालना शहर महानगरपालिका यांनी तात्काळ सदर ठिकाणी प्रत्यक्ष स्थळपाहणीसाठी शामसन कसबे अतिक्रमण पथकप्रमुख, शोएब खान, श्री. अरूण वानखेडे स्वच्छता निरीक्षक जालना शहर महानगरपालिका यांना आदेश दिले त्यानुसार संबंधित कर्मचारी यांनी पहाणी केली असता फुकटपुरा जुना जालना येथे सिकदर जिलानी शेख व शेख जुबेर शेख लाला हया इसमांनी सार्वजनिक ठिकाणी हानिकारक कचरा जाळुन लोकांच्या आरोग्यास संसर्ग धोका निर्माण केलेला आढळून आलेला आहे. महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या मदतीने आग विझवण्यात आली आहे. सदर कृत्याबाबत महानगरपालिकेकडून धडक कार्यवाही करत दोन्ही ईसमाना कचरा जाळुन आजुबाजुच्या परिसरातील नागरीकाच्या आरोग्यास हानी. पोहचवल्यामुळे १. सिंकदर जिलानी शेख यांना ५०००/- रूपये २. शेख जुबेर शेख लाला याना ५०००/- रूपये दंड आकारून पोलीस स्टेशन कदीम जालना येथे संबंधिताविरुध्द रितसर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# परतूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा ) शिवसेना (उबाठा ) यांच्यात महायुती कायम

## बाबुरावजी हिवाळे सारखा विश्वासू सच्चा माणूस नगराध्यक्ष पाहिजे- महेशभैया नळगे

परतूर । प्रतिनिधी

परतूर तालुक्यातील नगरपालिका निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने परतुरयेथे खुप मोठ्या प्रमाणात राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या असून परतूर येथे काही दिवसापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट) शिवसेना( उ बा ठा) व वंचित बहुजन आघाडी यांच्यात महाविकास आघाडी झाली होती,मात्र जागे वाटापा वरून थोडा वाद रंगला असता, शिवसेना जिल्हा प्रमुख महेश भैया नळगे आणि मा.आमदार सुरेश कुमार जेथलिया यांनी पत्रकार परिषद घेऊन वंचित बहुजन आघाडी वगळता महायुती कायम ठेवल्याचे पत्रकार परिषदेत स्पस्ट केले, ३० वर्ष नगरसेवक असलेले प्रामाणिक सच्चा कार्यकर्ते बाबुरावजी हिवाळे यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही शिवसेना (उबाठा ) पूर्ण ताकदीने, बाबुरावजी हिवाळे यांच्या सोबत थाट उभा आहे आणि राहणार, बाबुरावजी सारख्या सर्व जाती समभाव मनमिळावू नेर्तृत्व सच्चा माणूस, नगराध्यक्ष पदावर व्यक्ती पाहिजे,शिवसेना (उबाठा) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) आम्ही पूर्ण ताकदीने परतूर नगरपालिका निवडणूक लढवणार आहोत असे बोलत होते,




मा.आमदार सुरेशकुमारजी जेथलिया यांच्या ३० वर्षी एकहाती सत्ता असल्यामुळे त्यांना परतूरचे किंगमेकर असे बोलले जाते, शहरातील साठे नगर परिसरत राहणारे दलीत चळवळीच्या माध्यमातुन सामाजीक चळवळीचा वणवा पेटवणारे बाबुराव हिवाळे यांना प्रभाग क्र ११ (अ) मधुन नगरसेवक पदाची तर त्यांच्या पत्नी सौ.शांताबाई बाबुराव हिवाळे यांना परतुर नगराध्यक्ष पदाची उमेदवारी राष्ट्रवादी अजित पवार (सुरेशकुमार जेथलिया गटा) कडुन मिळाली आहे. या अटीतटीच्या निडणुकीत नेमकी कोण बाजी मारेल याकडे सर्वाचेच लक्ष लागून आहे. मात्र जेथालिया यांनी एकप्रकारे बाबुराव हिवाळे सारख्या सच्च्या कार्यकर्तेला न्याय दिला अशी चर्चा शहरात ऐकायला मिळत आहे. गेल्या अनेक वर्षापासुन मा.आ. सुरेशकुमार जेथलिया यांच्या खांद्याला खांदा लावत बाबुराव हिवाळे यांनी त्यांच्या राजकीय प्रवासात त्यांचा सारथी म्हणुन आजवर काम पाहिले. याबरोबरचं आपल्या प्रभागासह बाबुराव हिवाळे यांनी समाजचळवळीत आपला वेगळा परिचय निर्माण दाम्पंत्याला उमेदवारी मिळाल्याने केला आहे. सर्वच समाजात हवे हवेसे असणारे बाबुराव हिवाळे यांनी आजवर सर्वाच्या कामी येत जनसामान्यात हक्काचे स्थान निर्माण केले. गेली पंधरा वर्ष त्यांनी नगरसेवकपद व पंधरा वर्ष त्यांच्या पत्नी सौ. शांताबाई हिवाळे यांनी नबरसेविका म्हणून काम पाहत आजवर राजकीय प्रवासात आपला सामाजीक परिचय दिला आहे. परतुरच्या इतिहत प्रथमचं नगराध्यक्ष पदा ची जागा अनुसुचित जाती महिला साठी राखीव सुटल्याने अनेकांना बाबुराव हिवाळे व शांताबाई हिवाळे यांच्या कार्याची आठवण होत.

पालीकेचे किंग मेकर मा.आ. सुरेशकुमार जेथालिया हिवाळे तांईना संधी देतिल असा आत्मविश्वास वाटला. शहरात राजकीय वातावरण चांगलेचं तापले असल्याने उमेदवारी नेमकी कुणाला मिळेल याकडे सर्वाचेच लक्ष होते. व अपेक्षे प्रमाणे बाबुराव हिवाळे यांच्या पत्नी सौ. शांताबाई बाबुराव हिवाळे यांना नगराध्यक्ष पदाची व प्रभाग ११ अ ची नगरसेवक पदाची उमेदवारी बाबुराव हिवाळे यांना जाहिर करण्यात आली. याबाबत सर्वानांच यांचा आंनद झाला असुन परतुर पालीकेच्या नगराध्यक्ष म्हणुन सौ. शांताबाई हिवाळे यांना संधी हवी या भावनेतुन सर्व कार्यकर्त्योंनी कंबर कसली आहे

# शेवगाव पोलिसांची धडाकेबाज कारवाई; निवडणुकीपूर्वी रात्रीचा 'ऑलआऊट' थरार

## शस्त्र,दारू,जुगार,मावा विक्रेत्यांवर कारवाई..!

अहिल्यानगर । प्रतिनिधी

आगामी शेवगाव नगरपरिषद निवडणुका पूर्णपणे शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी शेवगाव पोलिसांनी राबवलेल्या मध्यरात्रीच्या 'ऑलआऊट ऑपरेशन'ने शहर हादरले.२३ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजता सुरू झालेल्या आणि २४ नोव्हेंबरच्या पहाटे ४ वाजेपर्यंत चाललेल्या या मोहिमेत गुन्हेगारीवर मोठा धडक देत विविध बेकायदेशीर कृत्यांवर कडक कारवाई करण्यात आली.ऑलआऊट दरम्यान आर्म्स ॲक्ट अंतर्गत एका इसमाकडून तलवार जप्त करून कायद्याचे दात दाखविण्यात आले.अवैध दारू व्यवसायावर सुद्धा पोलिसांनी धाड घालत दारूबंदीच्या ५ कारवाया केल्या असून ११,२६५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच,जुगार अड्ड्यांवर धडक देत ३ ठिकाणी छापे टाकण्यात आले.यातून ११,३०० रुपयांचे जुगार साहित्य व रोख रक्कम हस्तगत करण्यात आली. अवैध मावा विक्री करणाऱ्यांवरही कारवाई करत ५,००० रुपयांचे सुगंधित तंबाखू व साहित्य जप्त करण्यात आले.मुंबई पोलीस अधिनियम कलम १२२ अंतर्गत एका आरोपीवर कारवाई करण्यात आली आहे.याशिवाय, नॉन-बेलेबल वॉरंटमधील ८ आरोपींना अटक करण्यात आली असून बेलेबल वॉरंटमधील ८ जणांना वॉरंट बजावणी करण्यात आली.तसेच न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या १९ साक्षीदार व आरोपींना समन्सची बजावणी पार पाडण्यात आली.पोलिसांच्या यादीतील ६ हिस्ट्रीशीटर आरोपींची तपासणी करण्यात आली.शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात आली असून निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्यांवर कठोर कारवाईची इशारा देण्यात आला आहे.ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व त्यांच्यासोबत ४ अधिकारी आणि २५ पोलीस अंमलदारांनी केली. यावेळी शेवगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे म्हणाले की,निवडणुकी दरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ दिला जाणार नाही यापुढेही अशा धडक कारवाया सुरूच राहतील



राज्य लोकतंत्र
सत्तातंत्र
बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५ | ६

# माजलगावात दादाची राष्ट्रवादी बॅकफुटवर

## आ.सोळंके म्हणाले होते मतदारांना रोटी, बोटी अन् चपटी लागते त्याच बोलण्याचा परिणाम; मतदारात मोठी नाराजी

बीड । प्रतिनिधी

निवडणुकीच्या पूर्वी कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये निवडणूक सोपी नाही मतदारांना रोटी बोटी आणि चपटी लागते एवढेच काय पण लक्ष्मी दर्शन झाल्याशिवाय मत मिळत नाही या आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या वक्तव्यानंतर मतदारांना खाण्यापिण्यावरचे कार्यकर्ते असा उपरोक्त टोला लगावल्याचा परिणाम माजलगाव नगरपालिकेच्या निवडणुकीत दिसून येत आहे मतदाराने राष्ट्रवादीच्या घड्याळाकडे दुर्लक्ष केल्याचे शहरात दिसत आहे.

माजलगाव नगरपालिकेची निवडणूक अत्यंत चुरशीची होत आहेत प्रकाश सोळंके यांच्या विरोधात सर्वच गट एकत्र झाले आहेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रकाश दादा नको म्हणत बाबू पोटभरे मोहन जगताप सहल चाऊस यांनी दंड थोपटलेले असल्याने माजलगावात प्रकाश दादांची राष्ट्रवादी बॅक फुटवर आली आहे विशेष म्हणजे त्यांनी मुंडे कुटुंबासोबत घेतलेला पंगा हा निवडणुकीत अत्यंत अडचणीचा ठरणार असल्याचे दिसत आहे निवडणुकीतच पक्षाचे नेते असलेल्या धनंजय मुंडे यांना प्रचाराला आमच्याकडे पाठवू नका असे बोलून पुन्हा मिळणारी मते बाजूला गेली आहेत तर दुसरीकडे भाजपच्या पंकजा मुंडे यांनी स्वतंत्र उमेदवार देत प्रकाश सोळंके यांना खुले चॅलेंज केले आहे विशेष म्हणजे सहल चाऊस जगताप





पोटभरे यांनीही प्रकाश सोळुंके यांना चांगलेच अडचणीत घातले आहे निवडणुकीच्या पूर्वी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या उमेदवारी संदर्भात झालेल्या बैठकीत प्रकाश सोळुंके यांनी मतदारांना तुच्छ लेखले होते ते म्हणाले की निवडणूक सोपी नाही निवडणुकीसाठी रोटी बोटी आणि चपटी लागते याशिवाय लक्ष्मी दर्शन हे करावे लागते हा माझा अनुभव आहे हे बोलून त्यांनी मतदारांना त्यांची औकात दाखवली अशी चर्चा या वक्तव्यानंतर सुरू झाली मात्र आता मतदारांनी च ही चालून संधी आल्याचे पहात प्रकाश दादांनी उभ्या केलेल्या उमेदवारांना मतदाराला बाय-बाय करताना दिसत आहेत प्रकाश दादा निवडणुकीत हातखंडा मोठा आहे मात्र मतदाराच नसेल तर त्या हातखंडाचे करायचे काय असाही प्रश्न निर्माण होत आहे एक तर शहरातील मतदार आपल्यावर नाराज आहे दुसरीकडे आपण मुंडेंचा रोष ओढाहून घेतला त्यामुळे दादा

### मुंडेंना केलेला विरोध भोवणार

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षामध्ये व्यवस्थित सुरू असताना प्रकाश दादा सोळुंके यांनी धनंजय मुंडे यांना विरोध केला यांनी निवडणुकीमध्ये स्टार प्रचारक असलेले धनंजय मुंडे यांची सभा नको मनात केलेला विरोध याचा परिणाम या निवडणुकीमध्ये दिसून येत आहे अनेक राष्ट्रवादी मधीलच कार्यकर्त्यांनी धनंजय मुंडे यांची एलर्जी असेल तर आम्हालाही विचार करावा लागेल असा काही पदाधिकारी कार्यकर्त्यांनी निर्णय घेतला असल्याची समजते.

### धारूर पालिकेतही अशीच अवस्था

माजलगाव मतदार संघामध्ये माजलगाव सह धारूर या नगरपालिकेचे देखील निवडणूक होत आहे या ठिकाणी देखील भाजपाने तगडा उमेदवार दिल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची अवस्था माजलगाव सारखीच झाली असल्याचे दिसत आहे प्रचारात फक्त अजित पवारांचं नाव घेऊन चालत नाही भाजपाची पकड असलेल्या या धारूर मध्ये धनंजय मुंडे चे देखील नाव घ्यावेच लागणार होते मात्र प्रकाश दादांचा रोष पाहता मुंडे समर्थक भाजपकडे वळल्याचे दिसत आहे.

आता तुम्ही बसा असा सल्ला नागरिक देत आहेत एवढेच काय पण कुटुंबातही त्यांनी पुतण्याला फिरवलेच म्हणाली एकीकडे म्हणायचे पुतण्या माझा राजकीय वारसदार दुसरीकडे कारखान्याच्या चेअरमन पदाच्या खुर्चीवर स्वतःच्या मुलाला बसवायचे आणि वारसदार म्हणून पुतण्याचे नाव पुढे करत मतदान घ्यायचे हा डाव आता मतदार ओळखून आहेत सध्या माजलगाव शहरातील परिस्थिती पाहिली तर दादा पाठीमागे आणि मतदार पुढे अशी परिस्थिती दिसत आहे त्यामुळे यावेळी वेळ पाहून निशाणा साधण्याच्या तयारीत मतदार असल्याचे बोलले जात आहे.

# धारूरमध्ये नगराध्यक्षपदासाठी 'निर्मळ' चेहरा पुढे-पंकजा मुंडे

धारूर । प्रतिनिधी

आम्ही आग्रही विनंती करूनही डॉ. स्वरूपसिंह हजारी यांनी माघार घेतली. मात्र त्यांच्या स्वच्छ, पारदर्शक कारभाराच्या पायावर उभा राहील असा निर्मळ हा चेहरा आम्ही पुढे केला आहे. असे सांगून सर्व नगरसेवकांनी, मतदान करताना खाली कमळ, वर दुसरे काही असे प्रकार कोणी करू नका. सर्वांनी एकदिलाने कमळालाच मत द्यावे असा इशारा पंकजा मुंडे यांनी दिला.

धारूर येथे पालिका निवडणुकीत भाजप उमेदवाराच्या प्रचारार्थ मंगळवारी दुपारी नामदार पंकजा मुंडे यांची जाहीर सभा झाली . जाहीर सभेत मंत्री पंकजा मुंडे यांनी उमेदवारांच्या प्रचाराचा धुरा स्वतः हाती घेत जोरदार भाषणाने पक्षकार्यकर्त्यांत उत्साह निर्माण केला .पुढे मुंडे म्हणाले की, नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी भाजप उमेदवारांच्या विजयाचे पालकत्व डॉ. हजारी यांनी घेतले आहे. त्यांनी सर्व नगरसेवकांना कमळच चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन करताना इशारा दिला की, मतदान करताना खाली कमळ, वर दुसरे काही असे प्रकार कोणी करू नका. सर्वांनी एकदिलाने कमळालाच मत द्यावे. पंकजा मुंडेंनी धारूर शहराच्या विकासाची रूपरेषा मांडताना पाणीपुरवठा हा मुद्दा प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासन दिले. मी स्वतः दर तीन महिन्यांनी बैठक घेऊन ◀◀ पान ३ वर



# भाजप उमेदवारांच्या समर्थनार्थ माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आले मैदानात

बीड । प्रतिनिधी

शहरातील पेठ बीड परिसरातील व्यंकटेश मंगल कार्यालय येथे सोमवारी (दि.२४) सायंकाळी आयोजित व्यापक कॉर्नर बैठकीला माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या उपस्थितीमुळे सभेचे स्वरूप प्राप्त झाले. कार्यकर्ते व नागरिकांच्या उत्साहात झालेल्या या बैठकीत क्षीरसागर यांनी भारतीय जनता



पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रवींद्र घोमरे (घुंबरे) यांना तसेच सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.

पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले,सत्ता असो वा नसो आम्ही बीडची विकासकामे कधी थांबू दिली नाहीत, ◀◀ पान ३ वर

# मांजरसुंबा महामार्ग बनला मृत्यू मार्ग!

पाटोदा । प्रतिनीधी

पाटोदा-मांजरसुंबा महामार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. शनिवारी एकाच दिवशी झालेल्या दोन भीषण अपघातांत पाटोदा शहरातील व्यापारी अनिल बोरा आणि महाजनवाडी येथील अतुल श्रीराम घरत (वय २८) या दोघांचा मृत्यू झाला. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पहिल्या अपघातात, व्यापारी अनिल बोरा हे बीडहून पाटोदाकडे येत असताना सौंदाना पाटील परिसरात त्यांची दुचाकी अचानक रस्त्यावर कोसळली. पडताना डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी बीड आणि नंतर नगर येथे हलविण्यात आले. मात्र मेंदूला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. दुसऱ्या अपघातात, वैद्यकीय सेवेत असलेले अतुल श्रीराम घरत हे घरी परतत असताना सोनेगाव ◀◀ पान ३ वर

# विकासाचा नवा अध्याय शिवसेनेच्या माध्यमातून सुरू होणार - एकनाथ शिंदे

## जामखेड नगरपरिषद शिवसेनेच्या ताब्यात द्या; चेहरामोहरा बदलणार





जामखेड । प्रतिनिधी

जामखेड - जामखेड मध्ये सत्तेची लढाई सुरू आहे. राजकारण मक्तेदारी सुरू आहे. हीच मक्तेदारी मोडीत काढून सामान्य माणसाला विकासाचा केंद्र बिंदू मानुन विकासासाठी परिवर्तन करावयाचे आहे. शिवसेना विकासाची लढाई लढणार आहे. तुम्ही शिवसेनेच्या हातात नगरपरिषद सत्ता द्या तुमचे, रस्ते, पाणीपुरवठा, गटार योजना प्रभावीपणे पुर्ण केल्या जातील असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

जामखेड नगरपरिषद निवडणुक शिवसेना उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी

मी येणार नाही अशा अफवा पसरवल्या होत्या मी कार्यकर्त्यांच्या मागे उभा राहणारा नेता आहे. नगर विकास खाते एकनाथ शिंदे कडे आहे, शहरात चांगले गार्डन, रस्ते दिल्या शिवाय राहणार नाही. धनुष्यबाणाला निवडून द्या असे आवाहन शिंदे यांनी केले

आज स्वत: एकनाथ शिंदे यांची जामखेड येथे भव्य दिव्य अशी जाहीर सभेने प्रचाराचा शुभारंभ केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य प्रवक्ते डॉ राजू वाघमारे, डॉ. ज्योती वाघमारे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, जिल्हा उपप्रमुख संतोष वाळुंजकर, बापुसाहेब नेटके, युवा नेते आकाश बाफना, तालुका प्रमुख प्रा. कैलास माने, युवा सेना प्रमुख प्रविण बोलभट, कैलास जाधव, नितीन कोल्हे, शिवकुमार डोंगरे, बब्रुवान वाळुंजकर, यांच्या सह अनेक शिवसैनिक हजर होते. हिंदू मुस्लिम सर्व समाजाचे लोक शिवसेनेच्या प्लॅनल मध्ये एकत्र आले आहेत असा सर्व समावेश पॅनल आहे. प्रस्थापितांच्या विरुद्ध ही लढाई जिंकायची आहे, मी इथे आलो तेव्हा मला अनेक ◀◀ पान ३ वर

# काम करणाऱ्या उमेदवारांनाच मतदान करा-आ. क्षीरसागर



बीड । प्रतिनिधी


नागरिकांनी तुतारी वाजवणारा माणूस आणि मशाल या चिन्हावर मतदान करावे असे आवाहन आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपालिकेच्या राष्ट्रवादी काँग्रेसशरद पवार गट व शिवसेना उबाठा गट यांच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ बोलताना केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गट व शिवसेना उबाठा गटाचे उमेदवाराच्या प्रचारार्थ प्रभाग क्रमांक १९ मध्ये सभा झाली .या सभेत बोलतांना आमदार क्षीरसागर यांनी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे, प्रभाग क्रमांक १९ नगरसेवक पदाचे उमेदवार शोयब ईनामदार आणि श्रीमती मीराबाई विठ्ठल जाधव यांच्या प्रचारासाठी कॉर्नर सभा घेतली. यावेळी आमदार क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे चिन्ह तुतारी वाजवणारा माणूस आणि शिवसेना उबाठा गटाचे चिन्ह मशाल या दोन्ही वरच मतदान करून या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले .यावेळी माजी आमदार सय्यद सलीम, पक्षाचे सर्व उमेदवार, कार्यकर्ते, या प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोशल मीडियावरील बिबट्याची शहरात दहशत

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात बिबट्याची दहशत पसरली आहे. सोशल मीडियावर बिबट्याचा फोटो वायरल होत आहे, ज्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे.



सोशल मीडियावर बिबट्याचा फोटो एडिटिंग करून सोडला जात आहे. या फोटोमध्ये बिबट्याची आई आणि पिल्ले असल्याचे दिसत आहे. प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे. लोकांमध्ये घबराट पसरली आहे आणि त्यांना सुरक्षिततेची आश्वासन देण्यात यावे अशी मागणी होत आहे.

प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे. दोषींवर कारवाई करून लोकांना सुरक्षिततेची आश्वासन देण्यात यावे अशी मागणी होत आहे.

# पापा मोदी हे अंबाजोगाईच्या विकासाचा, विश्वासाचा ब्रँण्ड आहेत - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), समाजवादी पार्टी, रिपाइं आठवले गट, मनसे तसेच विविध मित्र पक्ष आणि संघटना पुरस्कृत लोक विकास महाआघाडीच्या नगराध्यक्ष तसेच शहरातील १५ प्रभागातील ३१ उमेदवारांच्या प्रचारार्थ सोमवार, दि.२४ नोव्हेंबर रोजी आयोजित सभेत बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी पापा मोदी हे अंबाजोगाईच्या विकासाचा, विश्वासाचा ब्रँण्ड आहेत. त्यामुळे सुजाण मतदारांनी लोक विकास महाआघाडीच्या राजकिशोर मोदींसह सर्वच उमेदवारांना आपला मतदानरूपी आशीर्वाद देवून विजयी करावे असे आवाहन केले.






लोक विकास महाआघाडीच्या नगराध्यक्ष तसेच शहरातील १५ प्रभागातील ३१ उमेदवारांच्या प्रचारार्थ सोमवार, दि.२४ नोव्हेंबर रोजी आयोजित सभेत बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, पापा मोदी हे अंबाजोगाईच्या ◀◀ पान ३ वर

# सामाजिक कार्याचा आशीर्वाद शुभम धूत यांना मिळणार

**बीड । प्रतिनिधी**

**गेली अनेक वर्ष सामाजिक कार्याचा वारसा आपले वडील पर्यटन महामंडळाचे संचालक व माजी नगराध्यक्ष दिलीप धुत यांच्याकडून घेत तो अविरतपणे चालू ठेवणारे शुभम धूत यांना नगरपालिका निवडणुकीत प्रभाग दोन मधून जनता मतदान रुपी आशीर्वाद देणार असल्याचे चित्र या प्रभागात दिसत आहे.**

पर्यटन महामंडळाचे माजी संचालक दिलीप धुत यांनी अनेक सामाजिक कार्य त्यांच्या कार्यकाळात पार पाडले आहेत प्रामुख्याने शिवसेनेत असताना त्यांच्या पत्नी स्मिता धुत या नगराध्यक्ष देखील होत्या घरातूनच



सामाजिक कार्याची आवड असलेले शुभम धूत त्यांच्या याच कार्यामुळे त्यांना स्वीकृत सदस्य म्हणून नगरपालिकेवर घेतले होते राजकीय पद मिळाले म्हणून अविर्भाव न दाखवता समाजकार्य चालूच ठेवणाऱ्या शुभम धुत यांनी मोठा युवक वर्ग गोळा केला वृद्ध पुरुष महिलांचे आशीर्वाद सर्व समाजामध्ये व्यापक असे संबंध निर्माण केले कोरोना काळ असो की अन्य अडचण या काळात अविरत मदत त्यांनी केली दीपावली असो की ईद असो या निमित्त गरजूंना लागणारे कौटुंबिक साहित्य त्यांनी पुरवली आता त्याचे आशीर्वाद मतदान आरोपी त्यांना मिळतील आणि त्यांचे प्रचाराचा हेच लोक पुढे होऊन करत असल्याचे दिसत आहे.

# उसाला भाव मागणाऱ्या १९ शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल

## नोटीस देऊनही आंदोलन केल्याने कारवाई

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना चालू हंगामामध्ये उत्पादन खर्चाच्या आधारित पहिल्या हप्त्याची एक रकमी चार हजार रुपये रक्कम प्रतिटन देण्यात यावी. या मागणीसाठी शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत माजलगाव- नेवासा महामार्गावर मध्यवर्ती चौकात रास्ता रोको व चक्काजाम आंदोलन करण्याचे निश्चित केले होते. यासंबंधी आंदोलन करताना पोलिसांनी रास्ता रोको न करता कायदेशीर मार्गाने त्यांच्या मागण्या शासनाकडे मांडाव्यात. सार्वजनिक जनजीवन विस्कळीत होईल अशी कुठलीही कृती करू नये. याची लेखी नोटीस दिली होती. मात्र आंदोलन करतांना हा आदेश न जुमानता रास्ता रोको व चक्काजाम आंदोलन करण्यावर ते ठाम राहिले. यामुळे या शेतकऱ्यावर माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या ऊसाला पहिला हप्ता चार हजार रुपये द्यावा. या मागणीसाठी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ वर दिनांक २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १२ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत रास्ता रोको करून सार्वजनिक वाहतुकीचा अडथळा निर्माण केला. तसेच ३००० शेतकरी एकत्र येऊन शासनाच्या विरोधात घोषणा दिल्या. याची माहिती मिळतात माजलगाव पोलीस ठाण्याचे अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थिती नियंत्रणात ठेवली. आंदोलन करताना जिल्हाधिकाऱ्यांचे जमाबंदीचे आदेश मोडून रास्ता रोको आंदोलन परवानगीशिवाय केल्याने कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होईल अशा पद्धतीने या ठिकाणी रास्ता रोको केला. पोलिसांनी दिलेल्या नोटीस लाही दाद दिली नाही. त्यामुळे आंदोलनात सहभागी असलेल्या अजय सिंग दिलीपराव राऊत, तुकाराम रावसाहेब नावडकर, कृष्णा पांडुरंग सोळंके, नामदेव माणिकराव सोजे, मोहन माणिकराव जाधव, जगदीश महादेव फरताळे, संजय केशव आंधळे, नारायण गणेश तौर, अजय गंगाधर बुरांडे, नारायण रामभाऊ गोले, भास्कर खांडे, विजय पांडुरंग राठोड, कुलदीप मधुकर करपे ,गंगाभीषण काशिनाथराव थावरे संपत रामसिंग चव्हाण, दत्ता मधुकर आढाव, विजय दराडे, शुभम ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# खासदार क्रीडा महोत्सवाचा गुरुवारी समारोप; अभिनेता अक्षयकुमारची विशेष उपस्थिती



पुणे : पुण्याचे खासदार आणि केंद्रीय सहकार व नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने आयोजित खासदार क्रीडा महोत्सवाचा येत्या गुरुवारी २७ नोव्हेंबर रोजी समारोप होणार आहे. खासदार क्रीडा महोत्सवांतर्गत दोन आठवडे विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

बालगटापासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत आणि महिलांपासून दिव्यांगांपर्यंत अशा सर्वांचा मोठा प्रतिसाद या स्पर्धेला लाभला. पुणे शहरातील २९ मैदाने आणि क्रीडा संकुलांमध्ये ३७ खेळांच्या विविध स्पर्धा या खासदार क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आल्या. त्यामध्ये तब्बल ४० हजारांहून अधिक आबालवृद्ध, दिव्यांग खेळाडूंनी सहभाग घेतला. आता हा महोत्सव अंतिम टप्पाकडे आला आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांसाठी, त्यांचा कौतुकसोहळा आयोजित करण्यात आला आहे. गणेश कला क्रीडामंच येथे गुरुवारी सायंकाळी पाच वाजता या समारोप सोहळा पार पडणार आहे. या वेळी प्रसिद्धी कलाकार अक्षय कुमार उपस्थित राहणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार असल्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.या वेळी खेलरत्न पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय नेमबाज अंजली भागवत, मुख्य समन्वयक मनोज एरंडे, ऑलिम्पियन रेखा भिडे, माजी कबड्डीपटू शांताराम जाधव, ऑलिम्पियन बॉक्सर मनोज पिंगळे, तेनसिंग नोर्गे पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे, माजी कबड्डीपटू शकुंतला खटावकर, ध्यानचंद पुरस्कार प्राप्त टेनिसपटू नितीन कीर्तने, सुरेखा द्रविड, श्रीरंग इनामदार या आजी-माजी खेळाडूंसह प्रकाश जावडेकर, धीरज घाटे, खा. मेधा कुलकर्णी, आ. भीमराव तापकीर, आ. सुनील कांबळे, आ. सिद्धार्थ शिरोळे, आ. हेमंत रासने, राजेश पांडे आदी नेते उपस्थित राहणार आहे.या स्पर्धेत एकूण ३७ खेळांचा सहभाग करण्यात आला होता. यात क्रिकेट, फुटबॉल, खोखो, कबड्डी अशा सर्व खेळांचा समावेश होता. गेल्या महिन्याभरापासून शहरातील विविध मैदानांवर या स्पर्धा सुरू होत्या. विजेत्या प्रत्येक खेळाडूला रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. आता या विजेत्या खेळाडूंच्या पाठीवर कौतुकाची छाप द्यावी. त्यांचा कौतुक सोहळा पाहून इतरांनाही खेळाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने समारोप सोहळा आयोजित करण्यात आला आहे, असे खासदार मोहोळ म्हणाले.

गेल्या महिन्याभरापासून स्पर्धा सुरू होत्या. खेळाडूंना एक चांगले व्यासपीठ मिळाले. नवोदित खेळाडूंना अनुभवी खेळाडूंचे मार्गदर्शन मिळाले. अनेक स्पर्धा चुरशीच्या झाल्या. अतिशय नेटके नियोजन या स्पर्धेचे करण्यात आले होते. आता या खेळाडूंचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या वर्षी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यातील विजेते उद्या आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करतील, तर आश्चर्य वाटायला नको. या स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा अंजली भागवत यांनी व्यक्त केली.

## 'उद्योजकाच्या मृत्यूप्रकरणी व्याजासह १९ कोटी रुपये भरपाई'; मोटार अपघात न्यायप्राधिकरणाच्या इतिहासातील सर्वात मोठी भरपाई



**पुणे । प्रतिनिधी**

उद्योजकाच्या मृत्यूप्रकरणी १० कोटी ९५ लाख ९९ हजार ५७९ रुपये नुकसान भरपाईचा आदेश मोटार अपघात न्यायप्राधिकरणाचे अध्यक्ष व प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी दिला आहे. या रक्कमेवर दावा दाखल केलेल्या तारखेपासून म्हणजे १ मार्च २०१६ पासून वार्षिक ७.५ टक्के व्याज द्यावे लागणार आहे. व्याजासह ही रक्कम १९ कोटी २० हजार १४६ रुपये होत आहे.

मोटार अपघात न्यायप्राधिकरणाच्या इतिहासातील ही सर्वात मोठी नुकसान भरपाईची रक्कम आहे. या प्रकरणात अर्जदारांतर्फे ड.संजय राऊत, ड.अनिता राऊत, ड.अश्विनी वाडेकर यांनी काम पाहिले. तर कंपनीतर्फे सुनील द्रविड यांनी बाजू मांडली.राजीव विनोद शहा यांच्या मृत्यूप्रक्राणी वडील विनोद मंगलदास शहा, आई इंदिरा, पत्नी सोनल, मुली सिमरन आणि आयुशी, मुलगा श्रेय यांनी येथील मोटार अपघात न्यायप्राधिकरण येथे दावा दाखल केला होता. अपघातातील ट्रकचे मालक आणि इफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनीच्या विरोधात मोटार अपघात न्यायप्राधिकरण येथे दावा दाखल केला होता.राजीव हे ९ जानेवारी २०१२ रोजी होंडा सिटी कारमधून मुंबईकडून चाकण येथील फॅक्टरीकडे चालले होते. त्यावेळी दुसऱ्या लेनमधून पुणेकडून मुंबईकडे ट्रक जात होता. त्या ट्रकने समोर जाणाऱ्या होंडा सिटीला धडक दिली. त्यामुळे ती होंडा सिटी गाडी समोरील लेनमध्ये घुसली. तिने राजीव असलेल्या होंडा सिटीला धडक दिली. त्याच वेळी पाठीमागून आलेल्या एशियाड एस.टी.चीही राजीव यांच्या गाडीला धडक बसली. या विचित्र अपघातात राजीव यांचा मृत्यू झाला.यामध्ये नुकसान भरपाईसाठी येथील मोटार अपघात न्यायप्राधिकरण येथे दावा दाखल केला. अर्जदारांतर्फे मयताचे वडील विनोद, अपघातातील होंडा सिटीचा चालक यांची साक्ष घेण्यात आली. या दोघांचीही विमा कंपनीतर्फे उलट तपासणी घेण्यात आली. तर एशियाड एस.टी.च्या चालकाची विमा कंपनीतर्फे साक्ष घेण्यात आली. त्याची उलट तपासणी अर्जदारांच्या वकिलांनी घेतली.

राजीव शहा यांचे १ एप्रिल २००७ ते १ एपिल २०१४ या कालवधीत भरलेले आयकर, दोन पासपोर्ट आणि इंजिनिअर डिग्री आणि पोलीस पेपर न्यायालयात दाखल केले होते. राजीव यांच्या उत्तराखंड येथील कंपनीच्या उत्पन्नाची माहिती देण्यात आली. अर्जदारांतर्फे उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या १६ न्याय निवाड्याचे दाखले देण्यात आले. त्यावरन न्यायालयाने हा निकाल दिला.

## भर झोपेत महिलेच्या गळ्यातील गंठण हिसकावले; ३ लाखांचा ऐवज घेऊन चोरटे फरार

**बारामती । प्रतिनिधी**

खताळपट्टा, ढेकळवाडी (ता. बारामती) येथील तरुण शेतकरी पार्थ अजित झारगड (वय २५) यांच्या घरी मध्यरात्री घरफोडी करून चोरट्यांनी तब्बल ३ लाख ३१ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.बारामती तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, झारगड कुटुंब नेहमीप्रमाणे २१ तारखेच्या रात्री १०.३० वाजता जेवण करून झोपले होते.

रात्री ३.३० वाजता पार्थ झारगड यांच्या पत्नी पूजा झारगड यांच्या किंकाळ्यांनी सगळ्यांची झोप मोडली. त्यावेळी एक अनोळखी व्यक्ती बेडरूममधून पळून जाताना दिसला. पार्थ यांनी त्याचा पाठलाग केला असता तो घराच्या मागील दरवाजातून उसाच्या शेतात पळून गेला. नंतर पत्नी पूजाने सांगितले की चोरट्याने तिच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठन हिसका मारून नेले. कुटुंबीयांनी घराची पाहणी केली असता मागील दरवाजाचा कडी-कोयंडा तोडलेला दिसला. जिन्याजवळ पर्स, पाकीट व बचतगटाची पुस्तके पडलेली दिसली. बेडरूममधील कपाट उघडे व अस्ताव्यस्त होती. कपाटातील दागिने व रोख रक्कम पूर्णपणे गायब असल्याचे स्पष्ट झाले.

यामध्ये सोन्याचे मिनी गंठन १० ग्रॅम (५५ हजार), सोन्याची चैन २० ग्रॅम (१ लाख १० हजार), सोन्याचे बदाम १ ग्रॅम (६ हजार), चांदीचे वाळे, पैंजन, ब्रेसलेट, कडे, चैन ७ ग्रॅम (१० हजार), रोख रक्कम १ लाख ५० हजार (५००च्या ३०० नोटा) असे ३ लाख ३१ हजारांचा ऐवज नेला. घटनेची नोंद बारामती ग्रामीण पोलीस ठाण्यात झाली असून चोरट्याचा शोध सुरु आहे. गावात अचानक घडलेल्या या चोरीमुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पेट्रोल पंपावर थरार! पूर्ववैमनस्यातून टोळक्याचा तरुणावर जीवघेणा हल्ला; ७ जणांवर गुन्हा दाखल

**न्हावरे प्रतिनिधी**

करडे (ता. शिरूर) परिसरात भारत पेट्रोल पंपावर रविवारी (दि. २३) सायंकाळी ७:४५ च्या सुमारास पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर सात जणांच्या टोळक्याने हल्ला चढवला. आरोपींनी लाथाबुक्क्या, लाकडी दांडक्यांनी तरुणाच्या डोक्यात व पाठीवर गंभीर मारहाण केली. याबाबत संकेत सुरेश गुजर (वय २१) याने शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. अजय वाळके याच्यासोबत आलेल्या पोपट वाळके, रवींद्र देशमुख, मयूर लंघे, वैभव वाळके तसेच इतर तीन आरोपींनी पेट्रोल पंपावर बेकायदेशीरपणे गर्दी जमवून दहशत निर्माण केली.

या सर्वांनी फिर्यादीला तोंडावर लाथाबुक्क्यांनी तसेच दोन लाकडी दांडक्यांनी निर्घृण मारहाण केली, ज्यात फिर्यादी गंभीर जखमी झाल्याचे समजते.या प्रकरणी सातही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेचा पुढील अधिक तपास पोलीस हवालदार दीपक पवार करत आहेत.

## शिरूर तालुक्यात आढळला तब्बल २० फुटाचा अजगर

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील गोलेगावच्या महाजनमळा परिसरात दरावस्ती येथे तब्बल ४० किलो वजनाचा आणि अंदाजे १५ ते २० फूट लांबीचा महाकाय अजगर आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सतिश वाखारे यांच्या शेजारील शेतात हा अजगर निवांत पडलेला दिसताच ग्रामस्थांची गर्दी झाली.

यावेळी पाहणीदरम्यान समोर आले की अजगराने एक शेळी पूर्णपणे गिळल्याची घटना घडली असून त्या भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच सर्पमित्रांची



टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली. सर्पमित्रांनी अत्यंत दक्षता आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने अजगराला पकडत त्याच्या पोटातील शेळीची सुटका करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यावेळी अजगर आक्रमक झाला. बचाव मोहिमेदरम्यान शेळी गंभीर जखमी झाल्याने तिचा मृत्यू झाला. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

या प्रचंड आकाराच्या अजगरामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी व नागरिकांनी वनविभागाला तातडीने योग्य उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. सर्पमित्रांनी अजगराला सुरक्षितरीत्या पकडून वनविभागाच्या ताब्यात देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

गोलेगाव महाजनमळा परिसरात एवढ्या मोठ्या अजगराचे दर्शन पहिल्यांदाच झाल्याचे ग्रामस्थ सांगतात. जंगलपट्ट्यापासून दूर असूनही एवढ्या आकाराचा अजगर कसा आला, हा प्रश्न उपस्थित होत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून शिरूर तालुक्यातील परिसरात वन्यजीवांची वाढती वर्दळ हा गंभीर विचाराचा विषय असल्याचे जाणकारांनी नमूद केले आहे.

## सागर भुजबळ उपसरपंचपदी बिनविरोध

**वाल्हे । प्रतिनिधी**



पुरंदर तालुक्यातील वाल्हे येथील उपसरपंचपदी सागर मदन भुजबळ यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी भुजबळ यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी अनिल हिरासकर यांनी त्यांची उपसरपंचपदी निवड जाहीर केली.ग्रामपंचायतीची निवडणूक दोन वर्षांपूर्वी इतिहासात पहिल्यांदाच बिनविरोध झाली होती. सरपंच म्हणून अतुल गायकवाड तर उपसरपंचपदी अमित पवार यांचीही बिनविरोध निवड झाली होती.

पवार यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंचपदी साम्राज्ञी लंबाते यांचीही बिनविरोध निवड झाली होती. लंबाते यांनी निर्धारित वेळेत राजीनामा दिल्यानंतर सरपंच गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील सोमवार (दि.२४) निवडणूक घेण्यात आली.यावेळी सागर मदन भुजबळ यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी अनिल हिरासकर यांनी भुजबळ यांची उपसरपंचपदी निवड जाहीर केली.

यावेळी माजी उपसरपंच साम्राज्ञी लंभाते, अमित पवार, ग्रामपंचायत सदस्य अमोल पवार, तेजस दुर्गाडे, हरी दुबळे, कविता पवार, प्रमिला पवार, मयुरी भुजबळ, पूर्वा राऊत, शीतल मदने आदी उपस्थित होते. निवडीनंतर सरपंच अतुल गायकवाड व ग्रामस्थ सदस्य यांच्या हस्ते सागर भुजबळ यांचा सन्मान करण्यात आला. दरम्यान, सागर भुजबळ यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, सचिन लंबाते, गिरीश पवार, माजी सरपंच दत्तात्रेय पवार, महादेव चव्हाण, वागदरवाडीचे सरपंच सुनील पवार, सुकलवाडीचे सरपंच संदेश पवार, आडाचीवाडी सरपंच सुवर्णा पवार, तंटामुक्तीचे अध्यक्ष जयवंत भुजबळ, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## पोलीस ठाण्यासमोरच हवालदाराला लाच घेताना पकडले; पोटगी वॉरंटसाठी मागितले पैसे

**पुणे । प्रतिनिधी**

पोटगी वसुली वॉरंट बजावण्यासाठी महिलेकडे पाच हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारणार्या वाघोली पोलीस ठाण्यातील हवालदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले. मंगळवारी (दि. २५) दुपारी वाघोली पोलीस ठाण्यासमोरच ही कारवाई झाल्याने खळबळ उडाली आहे. परमेश्वर मानिक पाखरे (वय ३७) असे लाच स्विकारणार्या हवालदाराचे नाव आहे. पाखरे याच्यावर वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत ३३ वर्षीय महिलेने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदार महिला यांचे पतीसोबत २०१५ पासून कौटुंबिक वाद सुरू असून त्यांनी पोटगीसाठी विटा येथील न्यायालयात दावा दाखल केला होता. ऑक्टोबर २०२४ मध्ये न्यायालयाने तक्रारदाराच्या बाजूने निकाल देत २०१५ पासून प्रति महिना पाच हजार रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले होते. मात्र, पतीने पोटगी दिली नसल्याने न्यायालयाने एकूण ६ लाख ६५ हजार रुपये थकीत रकमेची वसुली करण्यासाठी जप्ती व विक्रीचे वॉरंट जारी केले.हे वॉरंट तक्रारदार महिलेने स्वतः वाघोली पोलीस ठाण्यात दिल्यानंतर हवालदार पाखरे यांनी वॉरंट बजावून रिपोर्ट देण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच वारंवार मागितली. याबाबत महिलेने सोमवारी (दि.२४) एसीबीकडे धाव घेत तक्रार दिली. मंगळवारी तक्रारीची पडताळणी करण्यात आली. यात आरोपी हवालदार पाखरे यांनी वसुली वॉरंटची बजावणी करून रिपोर्ट देण्यासाठी लाचेची मागणी केली व ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर त्याच दिवशी वाघोली पोलीस ठाण्याजवळील अहिल्यानगर रोडवरील चहाच्या टपरीवर सापळा रचून पाखरे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## नीरावागजमध्ये बिबट्याचा मुक्त संचार

**बारामती । प्रतिनिधी**



बारामती तालुक्यातील नीरावागज परिसरात मागील काही दिवसांपासून बिबट्याचे पुन्हा एकदा दर्शन झाले असून गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील संतोष कुंभार यांच्या येथील सीसीटीव्हीमध्ये (दि.२३) पहाटे अंदाजे १.४५ वाजता बिबट्या स्पष्ट दिसून आला आहे. वडाच्या झाडाजवळ फिरताना त्याच्या हालचाली कॅमेऱ्यांत कैद झाल्या.गेल्या काही दिवसांत पशुधनावर हल्ल्यांची मालिका गावात बिबट्याची हालचाल वाढल्याचे संकेत याआधीच मिळाले होते.

मागील काही दिवसांत दोन ते तीन शेळ्या आणि एका कुत्र्याचा फडशा पाडल्याची माहिती समोर आली होती. (दि.२३) रात्री गाडे-धायगुडे वस्तीवर बाळासाहेब कृष्णा गाडे यांच्या एका शेळीला देखील बिबट्याने ठार केले आहे. या सलग हल्ल्यांमुळे शेतकरी वर्गात मोठी दहशत निर्माण झाली असून रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे देखील नागरिकांना कठीण झाले आहे.

प्रशासन आणि नागरिकांना आवाहन

स्थानिकांनी वनविभागाला माहिती दिली असून पुढील कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच नागरिकांना खालील बाबींचे पालन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. आवश्यक असल्याशिवाय रात्री बाहेर जाणे टाळावे. शेळ्या, गुरेढोरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. हालचाली दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे. निरावागज परिसरात वाढत्या बिबट्या हालचालीमुळे सावधगिरी बाळगण्याचे आवाहन प्रशासन आणि स्थानिक ग्रामस्थांनी केले आहे.

## जेजुरीत यात्रेकरूंसाठी वाहनतळ उभारणार : जयदीप बारभाई यांची ग्वाही

**पुणे । प्रतिनिधी**

मल्हार मार्तंडाची जेजुरी नगरीत यात्रेकरू भाविकांना वाहन पार्किंग करण्यासाठी पार्किंग तळ उभारणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जयदीप दिलीपभाई बारभाई यांनी दिली.

जेजुरी नगरपालिकेकडील असलेल्या जागा अधिकृत करून त्यावर दोन ते तीन मजली वाहन तळ उभारण्याची योजना पुणे शहराच्या धर्तीवर जेजुरी शहरात पार्किंग सुविधा उपलब्ध करणार आहे. जेजुरी शहरात यात्रेकरू भाविकांच्या गाड्या रस्त्यावर पार्किंग झाल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. जेजुरीच्या पर्यटनाबरोबर अर्थकारणाला एकप्रकारे गती मिळण्यास मदत होईल.

यात्रेकरूनी वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी मदत होईल. जेजुरी नगरपरिषदेचे माध्यमातून जेजूरीवासियांना सोयी- सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वतीने आम्ही कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जेजुरी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आम्हाला सर्व दहाही प्रभागामधून मोठ्या प्रमाणात लोकांचा पाठिंबा मिळत आहे. आगामी काळात जेजुरी शहराचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## बिबट्याच्या दहशतीमुळे ४ तालुक्यांत शाळांच्या वेळेत मोठा बदल

**पुणे । प्रतिनिधी**

दिवाळीनंतर पिंपरखेड परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात चिमुकल्यांचा बळी गेल्यानंतर प्रचंड दहशत निर्माण झाली. पालकांनी तर आपल्या मुलांना शाळेत पाठवणेच बंद केले. त्यामुळे शिक्षण खात्यासमोर मोठा पेच निर्माण झाला. शेवटी विद्यार्थ्यांचा जीव सर्वात मौल्यवान आहे, त्यांना भीतीच्या सावटातून बाहेर काढणे हीच आजची खरी जबाबदारी आहे.

शिरूर-आंबेगाव-खेड-जुन्नर हा पट्टा गेल्या काही वर्षांपासून बिबट्यांच्या वाढत्या हालचालींमुळे अतिसंवेदनशील मानला जातो. भीती, असुरक्षितता आणि अनिश्चिततेच्या छायेत दिवस जात असलेल्या या भागातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अखेर प्रशासनाने महत्त्वाचा आणि संवेदनशील निर्णय घेतला आहे. शासन आदेशानुसार बिबटप्रवण क्षेत्रातील सर्व शाळांची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी ४ अशी बदलण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांचे प्राणरक्षण हेच ध्येय ठेवून हा निर्णय घेण्यात आल्याचे पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी स्पष्ट केले.सध्या ऊसतोडीमुळे अनेक क्षेत्रे रिकामी झाली असून बिबट्यांचा वावर रस्त्यांच्या अधिक जवळ येऊ लागला आहे. त्यात हिवाळा, अंधार लवकर पडतोय, रस्ते ओस पडतात अशा वेळी विद्यार्थी घरी जाताना धोक्याची शक्यता नाकारता येत नाही.

ऊस, जंगल, डोंगराळ भाग, ओसाड रस्ते यातून जाताना त्यांच्या मनात नेहमी एकच भीती कुठे काही अनर्थ होऊ नये, पालकांच्या मनात अजूनच घालमेल. बिबट्यांच्या हल्ल्यांच्या वाढत्या घटनांनी परिस्थिती अधिकच गंभीर झाली होती.या सर्व गोष्टींचा बारकाईने अभ्यास करून प्रशासनाने विद्यार्थ्यांचे जीवित धोक्यात येऊ नये म्हणून हा निर्णायक पाऊल उचलले.



मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांमार्फत सर्व शाळांना परिपत्रक देत स्पष्ट निर्देश दिले आहेत, शाळेच्या वेळेत बदल करताना शाळा व्यवस्थापन समिती व शाळा समितीची मंजुरी घ्यावी, प्रत्येक विद्यार्थ्यांनी संध्याकाळी अंधार होण्यापूर्वी घरी पोहचले पाहिजे, सकाळच्या परिपाठात सुरक्षिततेबाबत उद्बोधन अनिवार्य, पालक मेळावे घेऊन विद्यार्थ्यांना आणताना-नेताना पालकांनी काळजी घ्यावी.

वर्गशिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थी सुरक्षित घरी पोहोचल्याची खात्री करावी, विद्यार्थी सुरक्षा समितीच्या बैठका दर महिन्याला घेऊन अतिरिक्त उपाययोजना कराव्यात.बिबट्या प्रकरण गंभीर असले तरी अशा संवेदनशील, कृतीशील आणि विद्यार्थीप्रेमी निर्णयामुळे आशेची नवी किरणं दिसू लागली आहेत.विद्यार्थ्यांच्या जीविताचा प्रश्न प्रशासनाने ज्या प्राधान्याने हाताळला, त्यातून खरी मानवीता आणि जबाबदारी दिसून आली आहे.

विद्यार्थ्यांचा जीव वाचणे हीच जबाबदारी

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तके नव्हे तर विद्यार्थ्यांची सुरक्षितता हीच शिक्षणव्यवस्थेची पहिली पायरी. प्रशासनाने घेतलेला हा निर्णय केवळ वेळ बदलण्यापुरता नाही; तो हजारो पालकांच्या मनातील काळजी कमी करणारा, ग्रामीण भागातील मुलांसाठी आश्वासक असा पुढाकार आहे. ग्रामस्थ, शिक्षक, पालक यांच्यात या निर्णयाबद्दल समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकांनी आता तरी मुलं सुरक्षितपणे शाळेत जाऊ-येऊ शकतील, असा दिलासा व्यक्त केला.